रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १७ ◆ अंक २७९
www.ramprahar.com
रविवार, २७ एप्रिल २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## राष्ट्र उभारणीत युवकांचे सक्रिय योगदान आवश्यक -पीएम मोदी



**नवी दिल्ली :** राष्ट्र उभारणीत युवकांचे सक्रिय योगदान असेल, तर देशाचा वेगाने विकास होतो आणि त्या देशाला जागतिक स्तरावर ओळख मिळते. आज भारताची महिलाशक्तीही नोकरीपासून ते अवकाश आणि विज्ञानापर्यंत विविध क्षेत्रात नवीन उंची गाठत असून सरकारचा ग्रामीण महिलांना सक्षम बनवण्यावरही भर आहे, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदींनी केले. ते शनिवारी (दि. २६) रोजगार मेळाव्यात बोलत होते. या वेळी दूरदृश्य प्रणालीद्वारे विविध विभागांमध्ये नवनियुक्त ५१ हजारपेक्षा अधिक तरुणांना नियुक्तीपत्रांचे वितरण करण्यात आले. नागरी सेवा दिनानिमित्त सांगितलेल्या 'नागरिक देवो भव' या मंत्राचे स्मरण करून आणि नागरिकांची सेवा करणे हे इष्टदेवतेच्या पूजेसारखे आहे यावर भर देऊन प्रामाणिकतेने व समर्पणाने भारत एक विकसित व समृद्ध राष्ट्र बनेल, असा विश्वासही पंतप्रधानांनी व्यक्त केला. **(सविस्तर वृत्त पान २ वर..)**

### अंतरंग
पनवेल मनपाच्या माध्यमातून पशुवैद्यकीय फिरता दवाखाना/२
रविप्रहरमध्ये वाचा विविध विषयांवरील लेख/४
एमसीएच्या स्पर्धेचे सामने रायगडात होणार/८

### पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा तीव्र निषेध

# पनवेलमध्ये विराट मशाल मोर्चा






**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या अमानुष दहशतवादी हल्ल्याचा तीव्र निषेध करण्यासाठी भारतीय जनता युवा मोर्चा पनवेल शहरच्या वतीने विराट मशाल मोर्चाचे आयोजन शुक्रवारी करण्यात आले होते. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रभक्तीचा धगधगता ज्वालामुखी बनलेला हा मोर्चा संपूर्ण परिसरात दहशतवादाविरोधात जागृतीचा संदेश ठरला.

आमदार प्रशांत ठाकूर, भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या प्रमुख उपस्थितीत पनवेल परिसरातील खांदा कॉलनी ते नवीन पनवेलदरम्यान निघालेल्या या विराट मशाल मोर्चात पदाधिकारी, कार्यकर्त्यांसह युवक-युवती, शेकडो नागरिकांनी सहभाग घेतला होता. या वेळी भारत माता की जय या घोषणेने परिसर देशभक्तीने निनादला, तर पाकिस्तानचा झेंडा जाळत दहशतवाद मुर्दाबाद, पाकिस्तान मुर्दाबाद अशा घोषणा देत संतापही व्यक्त झाला.

दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या निष्पाप नागरिकांना श्रद्धांजली अर्पण करताना त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात संपूर्ण देश सहभागी असल्याच्या भावना व्यक्त झाल्या. त्याचप्रमाणे देशाच्या एकात्मतेला हादरा देणारे प्रयत्न हाणून पाडण्यासाठी सरकारच्या पाठीशी अखंडपणे उभे राहण्याचा निर्धार या वेळी उपस्थितांनी व्यक्त केला.

या मशाल मोर्चात भाजपचे उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, अॅड. प्रकाश बिनेदार, चारुशीला घरत, माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, नवीन पनवेल शहर मंडळ अध्यक्ष दशरथ म्हात्रे, पनवेल शहर मंडळ अध्यक्ष सुमित झुंझारराव, नेरे मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, कामोठे मंडळ अध्यक्ष विकास घरत, महिला मोर्चाच्या पनवेल शहर अध्यक्ष राजेश्री वावेकर, माजी उपमहापौर सीता पाटील, माजी नगरसेवक अनिल भगत, मनोहर म्हात्रे, एकनाथ गायकवाड, तेजस कांडपिळे, प्रभाकर बहिरा, माजी नगरसेविका वृषाली वाघमारे, सुशीला घरत, **(पान २ वर..)**

## पनवेल महापालिकेच्या आंतरराष्ट्रीय क्रिकेट प्रशिक्षण केंद्राचे आज उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या वतीने नवीन पनवेल (पूर्व) भूखंड क्र. २८१, आदई सर्कल सेक्टर ११ येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिकेट प्रशिक्षण केंद्र उभारण्यात आले आहे. भविष्यातील यशस्वी क्रिकेटपटू घडविणाऱ्या या प्रशिक्षण केंद्राचा उद्घाटन सोहळा रविवारी (दि. २७) सकाळी ११ वाजता राज्याचे माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.



उद्घाटन सोहळ्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे, रोजगार हमी योजना, फलोत्पादन, खारभूमी विकासमंत्री भरत गोगावले, खासदार श्रीरंग बारणे, धैर्यशील पाटील, आमदार सर्वश्री प्रशांत ठाकूर, महेश बालदी, निरंजन डावखरे, ज्ञानेश्वर म्हात्रे, विक्रांत पाटील, तर सन्माननीय उपस्थिती भारतीय क्रिकेट संघाचे माजी कर्णधार पद्मश्री दिलीप वेंगसरकर, रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक गणेश देशमुख यांची असणार आहे.

आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधांनी सुसज्ज असलेल्या या केंद्रामुळे पनवेल परिसरातील नवोदित क्रिकेटपटूंना दर्जेदार प्रशिक्षण मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. क्रिकेट क्षेत्रात नवीन प्रतिभावान खेळाडू घडवण्यासाठी हे केंद्र उपयुक्त ठरणार आहे.

उद्घाटन सोहळ्यास मनपा कार्यक्षेत्रातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयुक्त मंगेश चितळे यांनी केले आहे.

### निवडक

#### पीकअपने स्वच्छता कर्मचाऱ्यांना चिरडले; सहा ठार, पाच जण गंभीर

**नवी दिल्ली :** भरधाव पीकअप गाडीने दिल्ली-मुंबई राष्ट्रीय महामार्गावर सफाई करीत असलेल्या स्वच्छता कर्मचाऱ्यांना चिरडले. यात सहा कर्मचारी ठार झाले, तर पाच जण जखमी झाले आहेत. हरयाणातील नुह जिल्ह्यातील इब्राहिम बास गावाजवळ शनिवारी (दि. २६) सकाळी हा भीषण अपघात झाला. पोलिसांनी अपघातस्थळी धाव घेत मृतांचे पार्थिव उचलले, तर जखमींना रुग्णालयात दाखल केले.

#### मुंबईत इमारतीला आग; महिलेचा मृत्यू; सहा जण जखमी

**मुंबई :** येथील उपनगरातील अंधेरी परिसरामध्ये एका बहुमजली निवासी इमारतीत शनिवारी (दि. २६) मध्यरात्री अडीचच्या सुमारास आग लागली. यात एका महिलेचा मृत्यू झाला असून सहा जण जखमी झाले आहेत. जखमींमध्ये महिला व लहान मुलांचा समावेश आहे. विंडो एसी आणि त्यातील वायरिंगमध्ये शॉर्टसर्किट झाल्यामुळे ही आग लागल्याचे समजते. जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

## विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच अंगी कौशल्य विकसित करणे आवश्यक -लोकनेते रामशेठ ठाकूर

### महात्मा फुले महाविद्यालयात पदवीदान समारंभ



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आजच्या स्पर्धेच्या काळात केवळ शिक्षण असून चालत नाही, तर विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच अंगी कौशल्य विकसित करणे आवश्यक आहे तसेच भावी आयुष्यात समाजातील सर्व घटकांना सोबत घेऊन वाटचाल करायला हवी, असा मोलाचा सल्ला रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी विद्यार्थ्यांना दिला.

'रयत'च्या पनवेल येथील महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात शनिवारी (दि. २६) पदवीदान समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. त्या वेळी महाविद्यालयाच्या स्थानिक व्यवस्थापन समितीचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर अध्यक्षस्थानावरून बोलत होते. या समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे माजी सचिव डॉ. जे.जी. जाधव उपस्थित होते.

या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व विषद करीत जीवनात यशस्वी होण्याचा कानमंत्र दिला. ते म्हणाले, आजच्या युगात टिकून राहायचे असेल तर कष्ट केल्याशिवाय फळ नाही व स्पर्धेशिवाय पर्याय नाही. मेहनत घेऊन शिकणारे विद्यार्थी गरूडझेप घेतात. विद्यार्थ्यांनी आवडीचे क्षेत्र निवडल्यास त्यांना यश नक्की मिळेल.

डॉ. जे.जी. जाधव यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांनी कर्मवीर अण्णांच्या जीवन चरित्रातून प्रेरणा घेतली पाहिजे तसेच आपल्या वर्तनातून विद्वत्ता सिद्ध करावी व स्पर्धेला न घाबरता सामोरे गेले पाहिजे.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर यांनी उपस्थितांचे स्वागत केले तसेच संस्थेच्या व महाविद्यालयाच्या प्रगतीचा आढावा प्रास्ताविकात घेतला.

समारंभास माजी विद्यार्थी मंडळाचे माजी अध्यक्ष महेंद्र घरत, महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. आर.ए. पाटील, डॉ. एन.बी. पवार, वाणिज्य शाखेचे विभाग प्रमुख प्रा. जे.बी. वारघडे यांच्यासह प्राध्यापक, शिक्षकेतर सेवकवर्ग, विद्यार्थी व त्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी मान्यवरांच्या हस्ते महाविद्यालयातील पदवीधर व पदव्युत्तर स्नातकांना पदवी प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रवीण गायकर, डॉ. प्रफुल्ल वशेणीकर व प्रा. डॉ. वाय.एच. उलवेकर यांनी केले, तर उपस्थितांचे आभार उपप्राचार्य प्रा. डॉ. राजाराम पाटील यांनी मानले.



## दहशतवादी हल्ल्यातील मृत पर्यटकांच्या कुटुंबियांचे मुख्यमंत्र्यांकडून सांत्वन

**पुणे : प्रतिनिधी**

जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या कौस्तुभ गणबोटे आणि संतोष जगदाळे या पर्यटकांच्या घरी जाऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या कुटुंबियांचे सांत्वन केले. आतापर्यंत ज्याप्रमाणे आपण खंबीर राहिले; त्याचप्रमाणेच यापुढेही खंबीर राहावे. राज्य शासन आपल्या दुःखात सहभागी असून आपल्या पाठीशी आहे, अशा शब्दांत मुख्यमंत्री फडणवीस यांनी त्यांना धीर दिला.

गणबोटे यांच्या गंगानगर कोंढवा येथील घरी नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, आमदार योगेश टिळेकर, सुनील कांबळे, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, कौस्तुभ गणबोटे यांच्या पत्नी संगीता गणबोटे, मुलगा तुषार, कुणाल, स्नुषा कोमल गणबोटे उपस्थित होते, तर जगदाळे यांच्या कर्वेनगर येथील निवासस्थानी राज्यमंत्री माधुरी मिसाळ, आमदार भीमराव तापकीर, सुनील कांबळे, स्व. संतोष जगदाळे यांच्या पत्नी प्रगती जगदाळे, मुलगी आशावरी जगदाळे आदी कुटुंबातील सदस्य उपस्थित होते. गणबोटे तसेच जगदाळे यांच्या पत्नी व मुलांनी घटनेबाबत सविस्तर माहिती दिली.






# राष्ट्र उभारणीत युवकांचे सक्रिय योगदान आवश्यक -पंतप्रधान मोदी



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

राष्ट्र उभारणीत युवकांचे सक्रिय योगदान असेल तर, देशाचा वेगाने विकास होतो आणि त्या देशाला जागतिक स्तरावर ओळख मिळते. आज भारताची महिला शक्ती नोकरीपासून ते अवकाश आणि विज्ञानापर्यंत विविध क्षेत्रात नवीन उंची गाठत असून, सरकारचा ग्रामीण महिलांना सक्षम बनवण्यावरही भर आहे, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदींनी केले. शनिवारी रोजगार मेळाव्याला संबोधित करताना ते बोलत होते. या वेळी दूरदृश्य प्रणालीद्वारे विविध विभागांमध्ये नवनियुक्त ५१ हजारपेक्षा अधिक तरुणांना नियुक्ती पत्रांचे वितरण आज करण्यात आले.

या वेळी बोलताना पंतप्रधान म्हणाले की, आज भारतातील तरूण समर्पण आणि नवोन्मेषाद्वारे आपल्या अफाट क्षमतांचे प्रदर्शन जगासमोर करीत आहेत. 'मेक इन इंडिया' उपक्रमाला प्रोत्साहन देण्यासाठी आणि भारतातील तरुणांना जागतिक स्तरावर प्रमाणित उत्पादने तयार करण्याची संधी प्रदान करण्यासाठी अर्थसंकल्पात, उत्पादन अभियानाची घोषणा सरकारने केली आहे.

हे उत्पादन अभियान देशभरातील लाखो एमएसएमई आणि लघु उद्योजकांनाच नव्हे तर देशभरात नवीन रोजगाराच्या संधीदेखील निर्माण करेल, असेही पंतप्रधान म्हणाले. या वेळी बोलताना मुबंईत आयोजित जागतिक दृकश्राव्य आणि मनोरंजन शिखर परिषद (वेव्हज) देशातील तरुणांना केंद्रस्थानी ठेवून तयार करण्यात आली आहे. पहिल्यांदाच तरुणांना असे व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. माध्यम, गेमिंग आणि मनोरंजन क्षेत्रातील येणाऱ्या लोकांना त्यांची प्रतिभा प्रदर्शित करण्याची अभूतपूर्व संधी 'वेव्हज'मुळे मिळेल, असेही पंतप्रधान म्हणाले.

पंतप्रधान म्हणाले की, आज भारत सरकारच्या विविध विभागांमध्ये या तरुणांच्या कारकिर्दीतील नवीन जबाबदाऱ्यांची सुरुवात होते आहे. देशाची आर्थिक चौकट मजबूत करणे, अंतर्गत सुरक्षा मजबूत करणे, आधुनिक पायाभूत सुविधांच्या निर्मितीमध्ये योगदान देणे आणि परिवर्तनकारी बदल घडवणे, अशी आवश्यक कर्तव्ये पार पाडण्याचे का या तरुणांना करावयाचे आहे, हे सर्व तरुण ज्या प्रामाणिकतेने आपल्या जबाबदाऱ्या पार पाडतील त्याचा भारताच्या विकसित राष्ट्र बनण्याच्या प्रवासावर सकारात्मक परिणाम होईल.

नव्याने नोकरीवर रूजू होणारे तरुण अत्यंत समर्पित भावनेने त्यांची कर्तव्ये पार पाडतील, असा विश्वास पंतप्रधानांनी व्यक्त केला. कुशल भारत, स्टार्टअप इंडिया आणि डिजिटल इंडियासारख्या उपक्रमांमुळे तरुणांसाठी नवीन संधी निर्माण होत आहेत.

## ◆ १४० कोटी भारतीयांची स्वप्ने पूर्ण करण्यासाठी काम करा

***या वेळी पंतप्रधानांनी 'एक पेड माँ के नाम' या उपक्रमाबद्दल सांगत निसर्गाप्रती कृतज्ञता आणि सेवेचा संदेश म्हणून प्रत्येकाने आपल्या आईच्या नावाने एक झाड लावावे, नवनियुक्त तरुणांनी त्यांच्या कामाच्या ठिकाणी या मोहिमेत अधिकाधिक लोकांना सहभागी करून घ्या, १४० कोटी भारतीयांची स्वप्ने आणि आकांक्षा पूर्ण करण्यासाठी काम करा, असे आवाहन केले. जूनमध्ये येणारा आंतरराष्ट्रीय योग दिन हा यशस्वी कारकिर्दीसोबतच निरोगी जीवन सुरू करण्याची एक उत्तम संधी आहे हे लक्षात आणून देऊन त्यांनी आरोग्य हे केवळ व्यक्तींसाठी आवश्यक नाही तर कार्यक्षमतेसाठी आणि देशाच्या उत्पादकतेसाठी देखील महत्त्वाचे आहे यावरही भर दिला.***

या मोहिमांद्वारे, सरकार भारतातील तरुणांना त्यांची प्रतिभा जगाला दाखवण्यासाठी एक खुले व्यासपीठ उपलब्ध करून देत आहे. या प्रयत्नांमुळे या दशकात, भारतातील तरुणांनी तंत्रज्ञान, माहिती आणि नवनिर्मितीच्या क्षेत्रात देशाला आघाडीवर नेले आहे. भारत आता रिअल-टाइम डिजिटल व्यवहारांमध्ये जगात आघाडीवर आहे आणि या यशाचे मोठे श्रेय तरुणांना जाते, असेही पंतप्रधान म्हणाले.

पंतप्रधानांनी अलीकडेच आलेल्या आलेल्या यूपीएससी निकालाचा हवाला देत भारतातील मुली विविध क्षेत्रात आघाडीवर असल्याचे म्हटले. पहिल्या पाच टॉपर्सपैकी तीन महिला आहेत. नोकरदार क्षेत्र ते अवकाश आणि विज्ञान अशा सर्व क्षेत्रात महिला नवीन उंची गाठत आहेत. सरकार स्वयं-सहायता गट, विमा सखी, बँक सखी आणि कृषी सखी यासारख्या उपक्रमांद्वारे ग्रामीण महिलांना सक्षम बनवण्यावर लक्ष केंद्रित करत आहे, ज्यामुळे नवीन संधी निर्माण झाल्या आहेत. हजारो महिला आता ड्रोन दीदी म्हणून काम करत आहेत.

देशात ९० लाखांहून अधिक बचत गट सक्रिय आहेत. यामध्ये १० कोटींहून अधिक महिलांचा समावेश आहे. या गटांना बळकटी देण्यासाठी सरकारने त्यांचे बजेट पाच पटीने वाढवले आहे. मुद्रा योजनेच्या सर्वात मोठ्या लाभार्थी महिला असून देशातील ५० हजारहून अधिक स्टार्टअप्समध्ये महिला संचालक असल्याचे पंतप्रधान म्हणाले.

नागरी सेवा दिनानिमित्त सांगितलेल्या 'नागरिक देवो भव' या मंत्राचे स्मरण करून आणि नागरिकांची सेवा करणे हे आपल्या इष्ट देवतेच्या पूजेसारखे आहे यावर भर देऊन, प्रामाणिकतेने आणि समर्पणाने भारत एक विकसित आणि समृद्ध राष्ट्र बनेल, असा विश्वासही शेवटी त्यांनी व्यक्त केला.

# पनवेल महापालिकेच्या माध्यमातून पशुवैद्यकीय फिरता दवाखाना




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्राणी व पशुपालकांसाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला असून, लहान-मोठ्या प्राण्यांच्या उपचार व आरोग्य सेवेसाठी पशुवैद्यकीय फिरता दवाखाना सुरू करण्यात येत आहे. या उपक्रमाचा उद्देश प्रभागानुसार सेवा पोहचवून प्राण्यांच्या आरोग्याचा दर्जा उंचावणे हा आहे.

पनवेल महानगरपालिका हद्दीतील लहान मोठ्या प्राण्यांच्या उपचारासाठी व आरोग्याचा दर्जा उंचावण्यासाठी पशुवैद्यकीय फिरता दवाखाना सुरु करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील पाळीव प्राणी व पशुपालकांची सोय होण्यासाठी प्रभागनिहाय वेळापत्रक जारी करण्यात येत आहे. नवीन पनवेल येथील पोदी याठिकाणी स्थित प्राणी निर्बिजीकरण केंद्रामध्ये भटक्या श्वानांसाठी व भटक्या मांजरींसाठी निर्बिजीकरण शस्त्रक्रिया, शस्त्रक्रियेनंतरची काळजी आणि प्राथमिक औषधोपचार करण्यात येत आहे. आता हि सुविधा वृद्धिंगत करण्यासाठी पनवेल महानगरपालिकेमार्फत वेळापत्रकानुसार पशुवैद्यकीय फिरता दवाखाना कार्यान्वित करण्यात येणार आहे. यामुळे शहरापासून दुरस्थ ठिकाणी पशुवैद्यकीय सेवा प्राथमिक उपचार, आरोग्य शिबिर, छोट्या शस्त्रक्रिया, रेबिज प्रतिबंधात्मक लसीकरण, वैद्यकीय सल्ला मिळणे शक्य होणार असून नागरिकांना त्यांच्या प्रभागामध्ये चांगल्या दर्जाची पशुवैद्यकीय सेवा उपलब्ध होणार आहे. पशु आरोग्य सुधारल्याने प्राणीजन्य रोगांना आळा घालण्यास मदत होणार असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी १०० डेज मेक ओव्हर ड्राईव्ह अंतर्गत प्राण्यांसाठी रुग्णालय उभारणी बाबत केलेल्या सूचनांचे पालनही होणार आहे.

पशुवैद्यकीय फिरता दवाखाना म्हणजे एक मोबाईल व्हेटरनरी क्लिनिक आहे, जे ग्रामीण किंवा दुर्गम भागांमध्येही जाऊन प्राण्यांवर उपचार करते. यामुळे दूरदूरच्या भागात वैद्यकीय सेवा पोहोचून पशुपालकांचा वेळ आणि खर्च वाचणार असून प्राण्यांचे आरोग्यमान चांगले राहण्यास मदत होणार आहे. पनवेल महानगरपालिकेच्या या अभिनव उपक्रमामुळे जनतेला स्थानिक पातळीवरच अत्यावश्यक पशुवैद्यकीय सेवा उपलब्ध होणार असून, प्राणी कल्याणासाठी ही एक सकारात्मक पावले ठरणार आहेत.

# पहलगाम हल्ल्यातील मृतांना सुधागड भाजपकडून श्रद्धांजली



**पाली : प्रतिनिधी**

भाजपचे नेते प्रकाश देसाई यांच्या प्रमुख उपस्थितीत परळी येथील निर्वाणा हार्म येथे शुक्रवारी (दि.२५) रात्री सुधागड तालुका भाजपची बैठक झाली. या वेळी पहलगाम येथे आतंकवादी हल्ल्यात मृत झालेल्या नागरिकांना श्रद्धांजली वाहण्यात आली व या हल्ल्याचा निषेध करण्यात आला.

भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जगतप्रकाश नड्डा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार महाराष्ट्रात गाव वस्ती संपर्क अभियान आयोजन करण्यासाठी, तसेच या अभियानात ग्रामीण भागात पंचायत समिती, जिल्हा परिषद गणाचा प्रमुख म्हणून नियुक्ती करण्याकरिता, शहरी भागात प्रभाग प्रमुख म्हणून नियुक्ती करण्याकरिता, तसेच पक्षाचे कामकाज शिस्तबद्ध पद्धतीने चालला पाहिजे याबाबत या वेळी मार्गदर्शन करण्यात आले.

सुधागड तालुका अध्यक्ष म्हणून पुन्हा श्रीकांत ठोंबरे यांची निवड झाल्याने त्यांना या बैठकीमध्ये शुभेच्छा देण्यात आल्या. तसेच पक्षाच्या कामकाजाबाबत आराखडा मांडण्यात आला. तसेच या बैठकीमध्ये श्रीकांत ठोंबरे यांनी मार्गदर्शन करताना पहलगाम येथे झालेल्या भ्याड हल्ल्याचा तीव्र शब्दात निषेध केला.

या बैठकीला प्रमुख उपस्थिती म्हणून भाजपचे जिल्हा चिटणीस विठ्ठल सिंधकर, चिटणीस आलाप मेहता, एससी सेलचे जिल्हा दक्षिण जिल्हा अध्यक्ष दीपक पवार, माजी उपसभापती उज्वला देसाई, माजी सभापती पुष्पा डुमना, भाजप महिला अध्यक्ष प्रणाली शेठ, भाजप युवा मोर्चा अध्यक्ष भास्कर पार्टे, पाली उपनगराध्यक्ष आरिफ मनियार यासह शेकडो कार्यकर्ते या बैठकीला उपस्थित होते.

# किहीम समुद्रकिनारी कासवांची पिल्ले झेपावली समुद्राकडे



**अलिबाग : प्रतिनिधी**

किहिम समुद्र किनारी ऑलिव्ह रिडले जातीच्या कासवाची ६८ पिल्लांचा रात्रीच्या अंधारात समुद्राकडे प्रवास सुरु झाला आहे. या क्षणाचा आनंद किहिम ग्रामस्थांनी जल्लोष करीत सादर केला. आतापर्यंत कासवांची ७३ पिल्ले समुद्रात सुखरूप सोडण्यात आली. मागील अनेक वर्षापासून ऑलिव्ह रिडले जातीची कासवं मुंबई आणि अलिबागच्या समुद्र किनारी नाहीशी झाली होती, आजच्या घटनेने येथील पर्यावरणात रक्षणात यश येत असल्याचे दिसून येत आहे

मागील ५२ दिवस किहिम ग्रामस्थ आणि वनविभागाचे कर्मचारी दिवसरात्र या घरट्यांचे रक्षण करीत होते आणि तो क्षण शुक्रवारी सायंकाळी ५ वाजता जवळ आला, याच दरम्यान घरट्यात हालचाल होत असल्याचे रक्षकाच्या लक्षात आले. त्यानंतर एकएक पिल्लू घरट्यातून बाहेर पडण्यास सुरुवात झाली. ८ वाजेपर्यंत ६८ पिल्ले बाहेर आली होती, या सर्वांना किहिमचे सरपंच प्रसाद गायकवाड, दक्षिण कोकण विभागीय वनअधिकारी कांचन पवार, कांदळवन कक्षाचे वनक्षेत्रपाल समीर शिंदे यांच्या हस्ते समुद्रात किहीम समुद्र समुद्रात सोडण्यात आले.

आज दिवसभरात आणखी पाच पिल्ले समुद्रात सोडण्यात आली. अद्याप साधारण ६० पिल्ले बाहेर येण्याची शक्यता आहे. येथील समुद्र किनाऱ्यावरील स्वच्छता ठेवण्यात यश येत असल्याचे हे द्योतक आहे. एकेकाळी अलिबागच्या समुद्रकिनारी मोठ्याप्रमाणात ऑलिव्ह रिडले जातीची कासवं अंडी घालण्यासाठी येत असत, परंतु वाढत्या प्रदुषणामुळे यात पुर्णपणे खंड पडला होता. ३ मार्च रोजी दुपारी एका ऑलिव्ह रिडले जातीची मादी अंडी घालत असल्याचे येथील नागरिकांच्या लक्षात आले होते. अंडी घातल्यानंतर मादी कासव समुद्रात निघून गेले. या अंड्याचे योग्य पद्धतीने जतन करण्यासाठी कांदळवन कक्षाने उपाययोजना आखत २४ तास पहारा ठेवला होता.

> **पिल्ले बाहेर पडताना घरट्यातील वाळू थोडीशी खचत असल्याचे पाहिल्यानंतर पिल्ले बाहेर येण्याची वेळ जवळ आलेली आहे, हे आमच्या लक्षात आले होते. त्यानंतर ओहोटीची योग्य वेळ आणि तापमानाचा योग्य अंदाज घेत ही पिल्ले बाहेर आली होती. साधारण १२०पेक्षा जास्त अंडी एका मादीने घातलेली असावीत. त्यामुळे आणखी बरीच पिल्ले बाहेर येऊ शकतात. किहिम ग्रामस्थांनी केलेल्या सहकार्यामुळे हे सर्व शक्य होत आहे.**
>
> **-कांचन पवार, कांदळवन कक्ष प्रमुख**

> **समुद्र किनारा स्वच्छ ठेवण्यात यश येत असल्याने ऑलिव्ह रिडले जातीचे कासव येथे पुन्हा घरटी करु लागली आहेत. पुर्वी या किनाऱ्यावर मोठ्या प्रमाणात झाडी होती, केतकीची जंगले होती, ती नाहीशी झाल्याने या घरट्यांमध्ये खंड पडलेला असावा. परंतु सर्वांच्या प्रयत्नाने हे दिवस परत आलेले आहेत .**
>
> **-प्रसाद गायकवाड, सरपंच, किहीम ग्रामपंचायत**

# 'शिवरायांच्या विचारांची देशाला गरज'




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सध्याच्या काळात छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचाराची देशाला गरज आहे, असे भावपूर्ण उद्गार रामजी कदम यांनी काढले. येथील के. गो. लिमये सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालय आयोजित वसंत व्याख्यानमालेचे शुक्रवारचे प्रथम पुष्प उलगडताना 'शिवचरित्र'या विषयावर ते बोलत होते.

ते पुढे म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज नेहमी जिवावर उदार होऊन आघाडीवर लढत असत. सूक्ष्म नियोजन, मुत्सद्दीपणा, चातुर्य, संयम यामुळे प्रतापगडचे युद्ध जिंकून त्यांनी अफजलखानाचा वध केला. शत्रूचा खजिना त्यांनी अलगद स्वराज्यात आणला. तब्बल तीन हजार गुप्तहेरांपैकी आपल्याला बोटावर मोजण्या एवढीच गुप्तहेरांची नावे माहीत आहेत. संभाजी महाराजांनी आपल्या वयाच्या नवव्या वर्षी हेरगिरी करून आग्र्याची इत्यंभूत माहिती चतुर्याने मिळवली. स्वतःची डमी वापरणारे शिवाजी महाराज हे पहिले योद्धे आहेत. तसा दुसरा प्रयत्न हिटलर यांनी केला होता.

रावणाची लंका पाहण्यासाठी महाराजांनी आग्रहात प्रवेश करण्याचे धाडस केले आणि हिकमतीने स्वतःची यशस्वी सुटका करून घेतली. आशिया खंडातील सर्वात मोठा व्यापार स्वराज्यात होता. महाराजांनी देशातील पहिले आरमार उभारले. जिजाबाई, रामदास व औरंगजेब या तिघांनाच शिवाजी महाराज खरे समजले होते. रांजे पाटलांविषयी निवाडा करण्याचे स्वातंत्र्य जिजाबाईंनी जाणीवपूर्वक शिवबाना त्यांच्या वयाच्या सोळाव्या वर्षी दिले. वक्त्यांचा परिचय वाचनालयाचे उपाध्यक्ष बी.पी.म्हात्रे यांनी करून दिला.

सूत्रसंचालन ॲड. माधुरी थळकर यांनी केले. समारोप संस्थेच्या अध्यक्षा ॲड. सुनिता जोशी यांनी केला. सुनील खेडेकर यांच्या आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी के.गो. लिमये वाचनालयाच्या ग्रंथपाल निकिता शिंदे, सहाय्यक ग्रंथपाल संपदा जोशी, लिपिक हर्षिता तुरकर व सेवक संजय दिवटे यांनी विशेष परिश्रम घेतले.

पान १ वरुन

## पनवेलमध्ये विराट मशाल मोर्चा

जिल्हा परिषदेचे माजी सदस्य अमित जाधव, शिवकर ग्रामपंचायतीचे सरपंच आनंद ढवळे, जगदीश घरत, ज्योती देशमाने, भीमराव पोवार, किशोर चौतमोल, शिवाजी भगत, गोपीनाथ मुंडे, सय्यद अकबर, रूपेश नागवेकर, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, अभिषेक भोपी, उपाध्यक्ष शिवानी घरत, रोहित जगताप, खारघर शहर अध्यक्ष नितेश पाटील, गौरव कांडपिळे, प्रीतम म्हात्रे, राकेश भुजबळ, कोमल कोळी, देवांशु प्रभाळे, अक्षय सिंग, रोहित कोळी, शुभम कांबळे, श्रवण घोसाळकर, मोतीलाल कोळी, यश भोईर, राजू महापूरकर, वरुण डंगर, कुलबीर सिंग, आशा मुंडे, रामनाथ पाटील, युवराज बेडसे, विश्वास काथारा, उदय काथारा यांच्यासह पनवेलकर मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपले विचार मांडताना म्हटले की, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारने कलम ३७० रद्द करून जम्मू काश्मीरच्या विकासाला चालना दिली. जगभरातले पर्यटक काश्मीरचे सौंदर्य पाहण्यासाठी मोठ्या प्रमाणात येऊ लागले असताना पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद्यांनी २६ पर्यटकांची हत्या केली. निष्पाप पर्यटकांचा यामध्ये दुर्दैवी अंत झाला. आपल्या पनवेलचे दिलीप देसले यांनाही गोळ्या झाडून मारण्यात आले. धर्म विचारून हिंदू लोकांची हत्या करणाऱ्या या घटनेचा मी निषेध करतो. पुढे बोलताना त्यांनी, आपल्याला या पाकिस्तानबद्दल चीड असणारे जे जे प्रसंग आहेत ते मनात साठवून ठेवले पाहिजे आणि त्या प्रसंगाची आठवण प्रत्येक क्षणाला आपल्याला झाली पाहिजे. देश बांधवांची अशा पद्धतीने हत्या करणाऱ्या शक्तींना मी कुठे थारा देत नाहीये ना याचा विचार आपल्याला प्रत्येक दिवशी प्रत्येक क्षणाला करावा लागणार आहे, असेही म्हटले.

पहलगाम येथे झालेला हल्ला हा फक्त मानवतेवर नसून हिंदू धर्मावर झालेला हल्ला आहे आणि म्हणून आज भाजप युवा मोर्चाच्या वतीने मशाल मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. ही मशाल सतत आपण पेटती ठेवली पाहिजे, असे मत भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी व्यक्त केले.

माजी नगरसेवक ॲड. प्रकाश बिनेदार आपल्या भावना व्यक्त करीत असताना म्हणाले की, नवीन पनवेल येथील दिलीप देसले यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. त्यांच्या निवासस्थानी काल लोकनेते रामशेठ ठाकूर, खासदार श्रीरंग बारणे यांनी भेट दिली आम्ही त्यांच्यासोबत होतो. लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी देसले कुटुंबियांना कोणतीही मदत लागल्यास माझ्या घराचे दरवाजे कायम उघडे असतील असे आश्वासित केले आहे.

# पनवेलमध्ये भ्याड अतिरेकी हल्ल्याचा निषेध




**पनवेल : वार्ताहर**

जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथे दहशतवाद्यांनी केलेल्या भ्याड आणि अमानुष हल्ल्याचा तीव्र निषेध व त्या हल्ल्यात शहीद झालेल्या निष्पाप पर्यटकांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी करंजाडे येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात शिवसेनेच्या वतीने श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमात शिवसेना जिल्हाप्रमुख अतुल भगत, उपजिल्हाप्रमुख विनोद साबळे, तालुकाप्रमुख रघुनाथ पाटील, उरण तालुकाप्रमुख दिपक ठाकूर, महिला जिल्हाप्रमुख मेघा दमडे, उरण विधानसभा सचिव हितेश नाईक, तालुका संपर्क प्रमुख बाळाजी नाईक, रामेश्वर आंग्रे, बळीराम म्हात्रे, प्रीती शहारे, नाथाभाई भरवाड, बाळासाहेब अवारी, मिरेंद्र शहारे, स्वप्नील मोरे, वसंत सोनावणे, अंजु सिंह, अर्चना शिंद्रुक, सुजित जाधव, राजाभाऊ नलावडे, अनिकेत चाळके, दिनेश धामणस्कर, तुलसी गौतम, वंश फडके तसेच करंजाडे परिसरातील असंख्य नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपला निषेध नोंदवला.

कार्यक्रमात उपस्थितांनी दोन मिनिटांचं मौन पाळून शहिदांना आदरांजली अर्पण केली. उपस्थित मान्यवरांनी आपापले मनोगत व्यक्त करत भारत सरकारने अतिरेक्यांना कडक उत्तर द्यावे, अशी मागणी केली.

## दुखवटा

### दत्तात्रय दबके



**चौक :** येथील व्यापारी आणि ज्येष्ठ नागरिक दत्तात्रय पांडुरंग दबके (वय ८९) यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगा प्रमोद तीन विवाहित मुली, नातवंडे असा परिवार आहे. कै. दत्तात्रय दबके जेष्ठ नागरिक म्हणून समाज उपयोगी कामे करायचे. अनेक गरीब गरजू लोकांना त्यांनी उधारीच्या माध्यमातून मदत केली आहे. त्यांच्या अंत्यविधीस राजकीय, सामाजिक, शैक्षणिक सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

## निवडक

### रस्त्यावर पडलेले खड्डे भरले



**पनवेल :** वाहतूक शाखेच्या पोलिसांनी अपघात टाळण्याच्या उद्देशाने रस्त्यावर पडलेले खड्डे भरून घेतल्याने त्यांच्या उपक्रमाचे कौतुक होत आहे. शिवशंभो नाका नो एंट्री पॉइंट वरील शहीद भोसले पेट्रोल पंप कडे जाणार्या रस्त्यावरील पडलेले खड्डे भरून घेण्याचे काम वाहतूक नियमन करत व सदर ठिकाणी अपघात होऊ नये म्हणून पनवेल वाहतूक पोलीस हवालदार युवराज येळे व अमीर मुलाणी यांनी स्वतः करून घेतले. यामुळे आगामी काळात होणारे अपघात टळणार असल्याने वाहनचालक व नागरिकांनी वाहतूक पोलिसांचे आभार मानले आहे.

### डम्परखाली चिरडून कामगाराचा मृत्यू

**पनवेल :** सिडको महामंडळाच्या घोट गावाशेजारील नागरी घनकचरा प्रक्रिया प्रकल्पामध्ये एका कामगाराचा डम्परच्या चाकाखाली चिरडून मृत्यू झाल्याची घटना घडली. मृत कामगाराचे नाव धर्मा बाळाराम पाटील असे आहे. धर्मा हे ५५ वर्षांचे होते. सिद्धी करवले गावात राहणारे धर्मा यांचा मुलगा राकेश याने तळोजा पोलिसांत याविषयी तक्रार नोंदवली. तक्रारीमध्ये सिडकोच्या नागरी घनकचरा प्रक्रिया व व्यवस्थापन प्रकल्पामध्ये सकाळी डम्पर (एमएच ४६ सीयू २६७२) या डम्परचालकाने मागच्या दिशेला डम्पर चालवताना हॉर्न दिला नाही, तसेच आवाजही दिला नाही. यामुळे या डम्परच्या मागील चाकाखाली घनकचरा प्रक्रिया प्रकल्पात काम करणार्या धर्मा यांच्या अंगावरून डम्पर गेला. या घटनेनंतर डम्परचालक पसार झाला. डम्परचालकाविरुद्ध पोलिसांनी गुन्हा नोंदवला आहे.

### मुलीच्या हत्येनंतर महिलेची आत्महत्या

**पनवेल :** तळोजा परिसरातील पेठाली गावात राहणाऱ्या एका ३० वर्षीय महिलेने चार वर्षांच्या मुलीला उशीने गुदमरून मारले. त्यानंतर स्वतः गळफास घेऊन आत्महत्या केली. सोनम अभिषेक केणी असे मृत महिलेचे नाव आहे. सोनम या मुलगी देवांशी हिला घेऊन वरच्या खोलीत झोपण्यासाठी गेल्या, मात्र सायंकाळी पावणेसहा वाजले तरी त्यांनी दरवाजा न उघडल्याने घरातल्या मंडळींना संशय आला. खोलीत देवांशी मृतावस्थेत आढळली आणि सोनम यांनी गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे पोलिसांनी पाहिले. मागील वर्षी एक वर्षाच्या बालिकेचा मृत्यू झाल्यापासून सोनम तणावात असल्याने त्यांनी हे पाऊल उचलले असण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. तळोजा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रवीण भगत हे अधिक तपास करत आहेत.

# उरणमध्ये बेकायदा पार्किंग केलेल्या वाहनांवर कारवाई

**उरण : प्रतिनिधी, बातमीदार**

नवी मुंबईचे वाहतूक पोलीस उपायुक्त तिरुपती काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली व सहाय्यक पोलीस आयुक्त वाहतूक विठ्ठल कुबडे यांच्या निर्देशाने उरण परिसर व एनएच ४- बी या महामार्गालगत व मुख्य रस्त्यावर पार्क होणाऱ्या अवजड वाहनांवर आळा घालण्यासाठी व त्यातूनच अपघाताचे प्रमाण कमी होण्यासाठी नवीन उपक्रमाद्वारे विशेष मोहीम राबविण्यात आली होती.

या दरम्यान सीएफएस व एमटी यार्ड यांच्या बाहेर पार्किंग होणाऱ्या अवजड कंटेनर व मुख्य रस्त्यावर पार्किंग करण्यात येणारी वाहने यावर भारतीय न्याय संहिता २८५ नुसार ९ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. वाहतुकीस अडथळा करणाऱ्या वाहनांवर मोटर वाहन कायदा १२२/१७७ नुसार ३६३ कारवाया करण्यात आल्या आहेत. याशिवाय सतत वाहनांची वर्दळ असलेल्या महामार्गांवर व गोदाम परिसरातील रोडवर कोणत्याही प्रकारे अवजड वाहने पार्किंग होणार नाहीत.

याची खबरदारी वाहनचालकांनी घ्यावी. सर्व वाहने नेमण्यात आलेल्या अधिकृत पार्किंगमध्ये उभी करावीत. महामार्ग अथवा गोदामांच्या रोडवर कोणतेही वाहन उभे करण्यात आलेले निर्दशनास आल्यास त्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे आवाहन उरण वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक अतुल दहिफळे वाहनचालकांना केले आहे.



## कळंबोली वाहतूक शाखेतर्फे मोटरसायकलस्वारांचे प्रबोधन



**पनवेल : वार्ताहर**

कळंबोली वाहतूक शाखेतर्फे त्या परिसरातून ये-जा करणाऱ्या मोटरसायकलस्वार चालकांचे प्रबोधन करण्यात आले.

कळंबोली वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हरिभाऊ बनकर यांच्यासह सहकाऱ्यांनी कळंबोली सर्कल येथे मुंबई लेनवर मोटरसायकलचालकांना हेल्मेट घालून बाईक चालवावी, ट्रिपल सीट न घेणे, लायसन जवळ बाळगणे, सिग्नल जम्पिंग, वाहन चालविताना मोबाईल फोनवर न बोलणे या व इतर वाहतुकीच्या नियमांची माहिती देऊन प्रबोधन केले. या वेळी या उपक्रमाचे वाहनचालकांनी स्वागत केले.

## रामशेठ ठाकूर विद्यालयाची इंटरॅक्टिव्ह लँग्वेज लॅबला भेट

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांची 'जागतिक इंग्रजी भाषा दिन' याचे औचित्य साधून २३ ते २५ एप्रिल २०२५ या काळात इंटरॅक्टिव्ह लँग्वेज लॅब, सीकेटी येथे शैक्षणिक भेटीचे आयोजन करण्यात आले होते.

सीकेटी महाविद्यालय, खांदा कॉलनी, नवीन पनवेल येथे इंटरॅक्टिव्ह लँग्वेज लॅब आहे. या शैक्षणिक भेटीचा फायदा विज्ञान आणि वाणिज्य शाखेतील सर्व विद्यार्थ्यांना झाला. लँग्वेज लॅब मधील सुविधा व उपक्रम समजून घेणे आणि इंग्रजी भाषेचे ज्ञान वाढविणे या मुख्य उद्देशाने या भेटीचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी इंग्रजी विभाग प्रमुख येवले सर यांनी भाषेचे महत्व सांगितले. यावेळी प्राचार्या निशा नायर या उपस्थित होत्या.





या कार्यक्रमासाठी संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय.टी.देशमुख, बोर्ड ऑफ डायरेक्टर संजय भगत, सचिव डॉ.एस.टी.गडदे, स्कूल कमिटी मेंबर प्रभाकर जोशी यांनी शुभेच्छा दिल्या होत्या.



**पनवेल : खांदा कॉलनी प्रभाग क्रमांक १५च्या वतीने पुरातन शिव मंदिराची सफाई मोहीम राबविण्यात आली. या वेळी भाजप नवीन पनवेल मंडळ अध्यक्ष दशरथ म्हात्रे, माजी उपमहापौर सीता पाटील, माजी नगरसेवक एकनाथ गायकवाड तसेच भीमराव पोवार, मोतीलाल कोळी, शशिकांत शेळके, गोपीनाथ मुंडे, अभिषेक भोपी, चंद्रकांत सोनवणे, संजय कांबळे, हरिदास वनवे, युवराज बेडसे, सूर्यभान जायभाये, अमोल घायाळ आदी उपस्थित होते. सर्वांनी स्वच्छता मोहिमेत सक्रिय सहभाग घेतला.**

## स्वामी समर्थ पुण्यतिथीनिमित्त कार्यक्रम

**उरण : वार्ताहर**

शहरातील आनंद नगर येथील श्री स्वामी समर्थ समाज मंदिर सेवा संघ यांच्या वतीने श्री अक्कलकोट स्वामी महाराज पुण्यतिथी शनिवारी होती. त्या निमित्ताने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, असे श्री स्वामी समर्थ समाज मंदिर सेवा संघचे अध्यक्ष शेखर म्हात्रे यांनी सांगितले. भक्तांनी मठात उपस्थित राहून तीर्थ प्रसादाचा लाभ घेतला. कार्यक्रमात स्वामी भक्त, सेवेकरी यांचे सहकार्य मिळाले.



## मधु मंगेश कर्णिक बोली भाषा अध्यासन केंद्र सुरू करणार -मंत्री उदय सामंत

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या वतीने बोली भाषेच्या संवर्धन आणि संशोधनासाठी पद्मश्री मधु मंगेश कर्णिक अध्यासन केंद्राची घोषणा करत असल्याची माहिती मराठी भाषा आणि उद्योगमंत्री डॉ. उदय सामंत यांनी केली.

ते कोकण मराठी साहित्य परिषदेच्या वतीने ज्येष्ठ साहित्यिक तथा कोकण मराठी साहित्य परिषदेचे संस्थापक अध्यक्ष पद्मश्री मधु मंगेश कर्णिक यांच्या वाढदिवसाचे अभिष्टचिंतन सोहळा आणि त्यांनी विविध विषयांवर लिहिलेल्या पाच पुस्तकांच्या प्रकाशन प्रसंगी बोलत होते. या सोहळ्यासाठी सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड. आशिष शेलार, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, सारस्वत बँकेचे अध्यक्ष गौतम ठाकूर, कोकण मराठी साहित्य परिषदेचे विश्वस्त प्रमुख रमेश कीर, कोकण मराठी साहित्य परिषदेचे अध्यक्षा नमिता कीर, कार्याध्यक्ष प्रदीप ढवळ आदी उपस्थित होते.



लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी मधुभाई यांच्या योगदानाचे कौतुक करत भविष्यात कोकण मराठी साहित्य परिषदेच्या अनेक उपक्रमाचा माध्यमातून कार्य करण्याची इच्छा व्यक्त केली, त्यांनी कोकण मराठी साहित्य परिषदेचे राज्यस्तरीय साहित्य संमेलन पनवेल येथे घेणार असल्याचे सांगून आपण जी साहित्य सेवा करत आहात अशा केशवसुत स्मारकाच्यासाठी १० लाखांची देणगी जाहीर केली.

या वेळी मॅजेस्टिक, मौज आणि उत्कर्ष प्रकाशन यांनी प्रकाशित केलेल्या मधु मंगेश कर्णिक यांच्या गूढ-निगूढ, स्वयंभू, उधाण, स्मृतिजागरफ आणि राजा थिबा या पाच पुस्तकांचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले तसेच गणेश कोळी संपादित पनवेल टाइम्सच्या वतीने पद्मश्री मधु मंगेश कर्णिक यांच्या वाढदिवसानिमित्त काढण्यात आलेल्या विशेषांकांचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

# उमरोली गावात विकासकामांचा धडाका

## ◆ भाजप नेते अरुणशेठ भगत यांच्या हस्ते शुभारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून मतदार संघामध्ये सातत्याने विविध विकासकामे केली जातात. शनिवारी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या स्थानिक ग्राम विकास निधी योजनेंतर्गत मतदार संघातील उमरोली गावाकडे जाणाऱ्या रस्त्याच्या काँक्रिटीकरणाचे काम हाती घेण्यात आला आहे. दहा लाखांच्या या कामांचे भूमिपूजन भाजपचे ज्येष्ठ नेते अरुणशेठ भगत यांच्या हस्ते झाले.

दरम्यान, आमदार प्रशांत ठाकूर यांच्या स्थानिक ग्रामविकास निधी योजनेंतर्गत तयार झालेल्या उमरोली ब्रिज ते राम मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्याचा उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमाला नेरे अध्यक्ष भूपेंद्र पाटील प्रल्हाद केणी, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य अमित जाधव, उमरोली ग्रामपंचायत सरपंच श्वेता माळी, माजी सरपंच शांताराम पोपटा, माजी सरपंच शुभांगी मढवी, माजी सरपंच कमला मढवी नारायण माळी सागर मढवी, महेंद्र माळी, नरेश मढवी, हनुमान माळी, निखिल मढवी, अशोक पाटील, कीर्तीकुमार पाटील, देहू माळी, विनोद जाधव, श्याममोहन गुप्ता आदी पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते.





## माँसाहेब मीनाताई ठाकरे ग्रंथालयामध्ये पुस्तक दिन

**उरण : वार्ताहर**

उरण नगरपरिषदेचे माँसाहेब मीनाताई ठाकरे ग्रंथालयामध्ये विद्यार्थ्यांना जागतीक पुस्तक दिनानिमित्त पुस्तक वाचण्याचा मनसोक्त आनंद घेतला.

सुयश क्लासेस चे हे विद्यार्थी तब्बल २ तास एका ठिकाणी शांतपणे विविध पुस्तके वाचून जे पुस्तक भावले ते घेऊन त्यामध्ये रममाण झाले. त्यानंतर ग्रंथपाल संतोष पवार यांनी अभ्यासाचे महत्त्व-शिक्षण हा आपल्या उज्वल भवितव्याचा पाया आहे हे विद्यार्थ्यांना पटवून दिले.

हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी ग्रंथालयातील



विद्यार्थी चेतन सोदारी, शिक्षक दिपक वायदाडे, शिक्षिका मनिषा म्हात्रे, शिक्षिका हेमांगी घरत, पालक स्वाती मोरे उपस्थीत होते विद्यार्थ्यांना लहान वयात वाचनाची गोडी लागणे आवश्यक आहे म्हणून वाचनालयातील सर्व विद्यार्थी आणि वाचकांनी उत्तम सहकार्य केले.

## ओरायन मॉलमध्ये वर्धापन दिन कार्यक्रम

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहरातील एकमेव मॉल म्हणुन प्रसिद्ध असलेल्या ओरायन मॉलचा नववा वर्धापन दिन रविवारी (दि.२७) आयोजित करण्यात आला आहे. या वर्धापन दिनी नऊ विजेत्यांना ओरायन मॉलच्या माध्यमातुन विशेष आकर्षक बक्षिसे देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. याकरिता मॉल प्रशासनाने आयोजित केलेल्या शॉप अँड विन कॉन्टेस्टच्या विजेत्यांची निवड तब्बल चार मराठी सेलेब्रिटी करणार आहेत.

या मराठी सेलेब्रिटी मध्ये स्मिता शेवाळे,नेहा नाईक समीर चौघुले, इशा डे आदी उपस्थित राहून पनवेलकरांशी संवाद साधणार असल्याची माहिती ओरायन मॉलचे मालक मंगेश परुळेकर आणि मनन परुळेकर यांनी दिली.दरम्यान नऊ विजेत्यांपैकी प्रथम विजेत्याला यमाहा फसिनो स्कुटर आणि द्वितीय विजेत्यांना आय पॅड व इतर विजेत्यांना आकर्षक बक्षिसे देण्यात येणार आहेत. रविवारी सायंकाळी ७.३० वेळी हा लकी ड्रॉ स्वतः सेलेब्रिटी विनर घोषित करणार येणार आहे.

## चिरनेर येथील प्राथमिक आश्रम योगवर्गाची सांगता

**पनवेल : वार्ताहर**

उरण तालुक्यातील चिरनेर प्राथमिक आश्रम शाळेत मागील आठ महिन्यापासून सुरु असलेल्या योग वर्गाचा सांगता समारंभ नुकताच पार पडला. या वेळी पनवेल तालुका प्रेस क्लब आणि तेरणा पद्मयोग साधना कॉलेजच्या माध्यमातून आदिवासी विध्यर्थ्यांना शालेय साहित्य आणि योगा टीशर्ट चे वाटप करण्यात आले.

योग केवळ पुस्तकात वाचण्यासाठी न राहता तो विद्यार्थ्यांच्या रोजच्या दैनंदिन जीवनाचा भाग व्हावा म्हणून योग शिक्षक विजय पवार यांनी मुख्याध्यापक मोरे सर यांच्या सहयोगाने मागील आठ महिन्यापासून योगासन वर्ग सुरू केला. पहाटे सहा वाजता सुरु होणाऱ्या या योग वर्गात इयत्ता चौथी ते सातवीचे २१ विद्यार्थ्यांना योगासन, ध्यानधारणा शिकत होते. उभ्याने केली जाणारी आसने, बसून व झोपून केल्या जाणाऱ्या आसनांबरोबर शीर्षासना सारखे अवघड आसनदेखील या योगवर्गातून विध्यार्थ्यांना शिकवण्यात आली यामुळे विद्यार्थ्यांमध्ये मानसिक आणि शारीरिक बदल घडून आल्याचे दिसून आले. मागील आठ महिने अविरत सुरू असलेल्या योगवर्गाचा सांगता समारंभ पार पाडला.



या वेळी तेरणा पद्मयोग साधना कॉलेजच्या प्राचार्या डॉ. सुषमा काळे, सुरेश काळे, चिरनेरमधील प्रसिद्ध उद्योजक राजेंद्र खारपाटील, पनवेल प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रशांत शेगडे, सहचिटणीस स्वप्नील दुधारे, माजी अध्यक्ष अनिल भोळे व पत्रकार उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी करून दाखविलेली आसनांच्या प्रात्यक्षिकांनी त्यांच्या मागील आठ महिन्याचा योगसाधनेचा अभ्यास पाहुण सर्व मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

या कार्यक्रमाचे औचत्य साधून पनवेल प्रेस क्लब तर्फे योगार्थी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्यवाटप व तेरणा पदमयोग साधना कॉलेजच्या वतीने टी शर्ट वाटप करण्यात आले.

# शोले ५० वर्षे

## अप्पर स्टॉल चार रुपये चाळीस पैसे, बाल्कनी पाच रुपये पन्नास पैसे

### झूम प्रहर



दिलीप ठाकूर
चित्रपट समीक्षक


तू (अथवा तुम्ही) शोले पाहिला तेव्हा मिनर्व्हात तिकीट दर किती होते? आतापर्यंत सर्वाधिक वेळा मला केलेला प्रश्न. असा प्रश्न करणाऱ्यांत चित्रपट रसिक, आजच्या ग्लोबल युगातील डिजिटल पिढीतील काही सिनेपत्रकार आणि ओटीटी युगातील काही फिल्मवाले असे मिलेजुले आहेत. मलाही हा प्रश्न आवडतो आणि मी त्यावर माहितीसह मनसोक्त मनमुराद उत्तर देतो. फ्लॅशबॅकमध्ये जाण्याची एक फिल्मी संधीच.


आज मल्टीप्लेक्स युगात चित्रपटाच्या खेळाच्या वेळेनुसार तिकीट दर असतात याची आपणासही कल्पना आहे. सकाळी नऊचा खेळ कमी रुपयांत आणि मिडनाईट मॅटीनी शो महागड्या तिकीट दरात हे आपणास माहीत आहेच. पडद्यावरचा चित्रपट तोच, पण वेळेनुसार त्याची किंमत बदलते असे आजचे युग. पूर्वी असे नव्हते असे अनेक बाबतीत प्रत्येक पिढी जुनी होत जाताना हमखास म्हणते त्यात हीदेखील एक गोष्ट. सिंगल स्क्रीन थिएटर्स अर्थात एकपडदा चित्रपटगृहाच्या चलतीच्या युगात दिवसा तीन खेळ तिकीट दर फिक्स असत आणि त्याच चित्रपटगृहात मॅटीनी शोला जुने चित्रपट प्रदर्शित होताना तिकीट दर उतरते असत. त्या काळातील आम्हा चित्रपट रसिकांच्या डोक्यात व खिशात हे समीकरण फिट्ट होते.

नाझ चित्रपटगृहाचा अनुभव सांगतो. नासिर हुसेन दिग्दर्शित 'यादों की बारात' असो, जे. ओम प्रकाश दिग्दर्शित 'आप की कसम' असो, स्टॉल तिकीट दर दोन रुपये वीस रुपये (शोच्या वेळेपूर्वी वीस मिनिटे अगोदर ही खिडकी उघडली जाई), अप्पर स्टॉल तीन रुपये तीस पैसे व बाल्कनी चार रुपये चाळीस पैसे असे तिकीट दर होते (या तिकीटांची आगाऊ तिकीट विक्री होत असे. तिकीटे शिल्लक राहिलीच तर करंट बुकिंगची खिडकी उघडे). याच नाझ चित्रपटगृहात मॅटीनी शोला एका आठवड्यासाठी प्रदर्शित होणारे जुने चित्रपट पुढील पिढीसमोर उत्तम पर्वणी असत. याच नाझमध्ये मी मॅटीनी शोला विजय आनंद दिग्दर्शित 'नौ दो ग्यारह', सुबोध मुखर्जी दिग्दर्शित 'जंगली', नरेंद्र बेदी दिग्दर्शित 'बंधन' असे अनेक जुने चित्रपट एन्जॉय केले. म्युझिकल सुपरहिट चित्रपट हे त्या काळातील मोठेच वैशिष्ट्य. नाझला मॅटीनी शोला स्टॉल एक रुपया पासष्ट पैसे, अप्पर स्टॉल दोन रुपये वीस पैसे व बाल्कनी दोन रुपये पंचाहत्तर पैसे असे तिकीट दर असत.


गिरगावातील सेन्ट्रल चित्रपटगृहात, डॉ. भडकमकर मार्गावरील इंपिरियल चित्रपटगृहात मॅटीनी शोला हेच दर स्टॉल एक रुपया पाच पैसे, अप्पर स्टॉल एक रुपया पासष्ट पैसे व बाल्कनी दोन रुपये वीस पैसे असे तिकीट दर होते. आज वयाची साठी अथवा पासष्टी ओलांडलेले चित्रपट रसिक एव्हाना नक्कीच फ्लॅशबॅकमध्ये गेले असतील. उपनगरात, अन्य शहरांत, ग्रामीण भागात यापेक्षाही कमी दरात चित्रपट एन्जॉय करता येई. तो खरा चित्रपटाचा सुवर्ण काळ होता. पडद्यावरच्या जगात हरवून हरखून जाता येई. भारी आवडलेला चित्रपट पडद्यावर ठेवून बाहेर पडले जात नव्हते.

...आणि अशातच मुंबईत १५ ऑगस्ट १९७५ रोजी 'शोले' आला.






मिनर्व्हा व न्यू एक्सलसियर चित्रपटगृहात सत्तर एमएम व स्टीरिओफोनिक साऊंड अशा भव्य रुपात आणि मुंबईतील गीता, गणेश, शारदा, बादल, कलामंदिर, मिलन, बहार, चंदन इत्यादी तसेच ठाणे शहरातील आनंद व वंदना चित्रपटगृह, कल्याणमधील न्यू प्रकाश इत्यादी चित्रपटगृहात पस्तीस एमएम अशा स्वरुपात जी.पी. सिप्पी निर्मित व रमेश सिप्पी दिग्दर्शित शोले आणि त्याच शुक्रवारी शालिमार चित्रपटगृहात मॅटीनी शो व इतरत्र गरीबी हटाव हा चित्रपट प्रदर्शित झाला. आर.के. मोठा नावाचे दिग्दर्शक होते आणि या चित्रपटात राजवंश, रचना, नरेंद्रनाथ, पद्मा खन्ना, अनिता गुहा इत्यादींच्या प्रमुख भूमिका आहेत. म्हणजेच सामना एकतर्फी होता. या दोन्ही चित्रपटांच्या जाहिराती माझ्या कलेक्शनमध्ये आहेत. तोपर्यंत मुंबईत यश चोप्रा दिग्दर्शित दीवार (२४ जानेवारीला प्रदर्शित) रौप्य महोत्सवी आठवड्यानंतरची घोडदौड सुरू केली होती. मिनर्व्हावरून मोती चित्रपटगृहात पुढचा प्रवास सुरु झाला होता (त्यानंतर तोच प्रवास लिबर्टीत मॅटीनी शोला शंभराव्या आठवड्यापर्यंत चालला), 'जय संतोषी मा' (३० मे रोजी प्रदर्शित) अलंकार मॅटीनी शो, एडवर्ड, किस्मत या चित्रपटगृहात हाऊसफुल्ल गर्दीत सुरू होता के.एस. सेतुमाधवन दिग्दर्शित 'ज्युली' (१८ एप्रिल), फिरोज खान दिग्दर्शित 'धर्मात्मा' व दादा कोंडके निर्मित व दिग्दर्शित 'पांडू हवालदार' हे दोन्ही चित्रपट एकाच शुक्रवारी म्हणजेच ९ मे रोजी प्रदर्शित होऊन लोकप्रिय ठरले होते. १६ मे रोजी मुंबईत रवि टंडन दिग्दर्शित 'खेल खेल मे' रिलीज झाला. असे करत करत आणखी काही चित्रपट प्रदर्शित होत होत असतानाच 'शोले' आला रे आला आणि पडला पडला असे म्हणता म्हणता असा काही सुपरहिट झाला की असं वाटतयं की तो आजही पडद्यावर सुरू आहे. मिनर्व्हाची इमारत केव्हाच पाडलीय, पण आजही तेथून जाताना गब्बरसिंगची दहशत जाणवते. पिक्चर असा इतपत मुरायला हवा. याला पिक्चरची ताकद म्हणतात.





'शोले'साठी मिनर्व्हात स्टॉलच्या पहिल्या चार रांगा रिकाम्या असत, कारण तेथे बसून सत्तर एमएमच्या पडदाभरचा शोले पाहणे जिकरीचे होते. अप्पर स्टॉल चार रुपये चाळीस पैसे व बाल्कनी पाच रुपये पन्नास पैसे असे तिकीट दर आज किरकोळ वाटतात. पन्नास वर्षांपूर्वी मात्र ते थोडे महाग वाटत. पिक्चर मोठा म्हणून तिकीट दर चढे हे समीकरण पटेल न पटेल पण होते हे खरे. त्या काळातील मध्यमवर्गीय व कनिष्ठ मध्यमवर्गीयांसाठी नक्कीच थोडे जास्त होते आणि पिक्चर हिट झाल्यावर हेच तिकीट दर परवडण्यासारखे झाले. हीच तर आपल्या देशातील चित्रपट प्रेक्षक संस्कृती आहे.

'शोले' मिनर्व्हात हाऊसफुल्ल गर्दीत (या चित्रपटगृहाची प्रेक्षक संख्या १४९९ अशी भरपूर) पडदाभर पाहण्यात एक वेगळेच थ्रील होते. माझी आणि माझ्या अगोदरची पिढी याबाबत भाग्यवान. चित्रपट मोठ्याच पडद्यावर पहायचा असतो हे त्या काळात सांगावे लागत नव्हते. तीच तर पद्धत होती. स्टिरिओफोनिक साऊंड सिस्टीमचा परिणाम 'शोले'ची रोमांचकता वाढवत होते. धडधड करीत जाणारी माल ट्रेन, गब्बरसिंग व टोळीची बेभान घोडेस्वारी, जय व वीरू यांच्यातील नाणेफेकीचा प्रसंग, राहुल देव बर्मनचे पार्श्वसंगीत, गब्बरसिंगचे विशिष्ट लयीत बोलणे हे सगळेच मिनर्व्हात एक रोमांचक अनुभव देई. तिकीटावर ते लिहिलेले कसे असेल? पण वाढत्या तिकीट दरात हे अनुभवता येई आणि ते पुन्हा पुन्हा अनुभवण्यासाठीच मिनर्व्हात पुन्हा पुन्हा जाणारे, रांगेत उभे राहून तिकीट काढणारे फिल्म दीवाने अनेक. पुन्हा पुन्हा चित्रपट एन्जॉय करणारे आणि त्यावर मनापासून बोलणारे चित्रपट रसिक जास्त यश देत असतात. या प्रेक्षकांच्या बळावर चित्रपट ज्युबिली हिटचा प्रवास सहज करीत. मिनर्व्हात शोले दिवसा तीन खेळ याप्रमाणे ३१ ऑगस्ट १९७८पर्यंत मुक्कामाला होता आणि मग तेथेच मॅटीनी शोला शिफ्ट केल्यावर आणखी दोन वर्ष असा एकूण पाच वर्ष शोलेने प्रवास केला. त्या काळात गावाकडील नातेवाईक वा ओळखीचे मुंबईतील नातेवाईकांकडे आल्यावर त्यांना मुंबईतील गेट वे ऑफ इंडिया, गिरगाव चौपाटी, मलबार हिल, शिवाजी पार्क याबरोबरच मिनर्व्हात शोलेही दाखवत अशी सामाजिक सांस्कृतिक स्थिती होते. शोलेचे हे वेगळेच यश.

शोलेच्या पन्नास वर्षांच्या खणखणीत वाटचालीत या चित्रपटावर इतकं नि असं सातत्याने लिहिले जातेय की हा कदाचित जागतिक पातळीवरील विक्रम ठरावा. त्यात त्याचे तेव्हाचे मिनर्व्हातील तिकीट दर हा कदाचित छोटी गोष्ट वाटेलही, पण तसे अजिबात नाही. याचे कारण सत्तरच्या दशकात सिंगल स्क्रीन थिएटर्समधील स्टॉलचा पब्लिक म्हणून पडदाभरचा चित्रपट पाहताना त्या काळातील तिकीट दर ही एक वेगळीच सवय होती. ऑनलाईनच्या आजच्या युगात त्यात काय एवढेसे असे वाटत असेलही, पण त्या काळातील हा तिकीट दराचा अनुभव काही वेगळाच. आपल्या देशातील चित्रपट प्रेक्षक संस्कृतीतील हाही एक रंगतदार फंडा.

---

# सहकारमहर्षी विठ्ठलराव विखे-पाटील



महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखानदारीचे आद्य प्रवर्तक विठ्ठलराव एकनाथराव विखे-पाटील यांची आज पुण्यतिथी. त्यांचा जन्म १२ ऑगस्ट १८९७ रोजी अहमदनगर (आताच्या अहिल्यानगर) जिल्ह्यातील लोणी बुद्रुक (ता. श्रीरामपूर) या खेड्यात एका शेतकरी कुटुंबात जन्म. तिथेच प्राथमिक शाळेत चौथीपर्यंत घेतले व नंतर त्यांनी लहान वयातच शेतीला सुरुवात केली.

त्या काळी शेतकऱ्यांच्या जमिनी कर्जबाजारीपणामुळे सावकारांच्या घशात गेल्यामुळे ते कंगाल बनले होते. हे नेमके हेरून विठ्ठलरावांनी व्हवहारबुद्धी, चातुर्य व काटकसरीने शेती केली. १९२३मध्ये लोणी बुद्रुक सहकारी पतपेढीची स्थापना करून ते सार्वजनिक जीवनातील सहकारी क्षेत्राकडे वळले. त्यांनी जिल्ह्यात सहकारी संस्थांचे जाळे निर्माण केले, तसेच गावातील पाथरवट-वडार मंडळींना एकत्र आणून मजूर सहकारी सोसायटीची स्थापना केली.

इंग्रज सरकारने मुंबई कौन्सिलमध्ये 'तुकडे बंदी आणि तुकडे जोड' हे विधेयक आणले. या विधेयकामुळे शेतकऱ्यांच्या जमिनीचे तुकडे सावकाऱ्यांच्या घशात जाऊन ते जमिनीला मुकणार होते. अशा वेळी इस्लामपूर येथे शाहू महाराजांनी घेतलेल्या शेतकरी परिषदेला विखे-पाटील नगर जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांसह गेले व तेथे हजारो शेतकऱ्यांपुढे भाषण देऊन शेतकऱ्यांच्या प्रश्नांना वाचा फोडली. त्यातूनच त्यांच्या शेतकरी नेतृत्वाचा जन्म झाला.

पुढे महाराष्ट्राच्या एक लाख शेतकऱ्यांनी याच प्रश्नासाठी पुण्याच्या कौन्सिल हॉलला वेढा घातला. त्यात विखे-पाटील आघाडीवर होते. त्यांनी शेतकऱ्यांना त्यांच्या दैन्यावस्थेची जाणीव करून देऊन संघटित होण्याचे व त्यातून व्यक्तिगत व सामुदायिक विकास साधण्याचे महत्त्व पटवून दिले.

प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ धनंजयराव गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखाली बेलापूर रोड (श्रीरामपूर) येथे १९४५मध्ये पार पडलेल्या द डेक्कन कॅनॉल्स बागायतदार परिषदेत विखे-पाटील यांनी सर्व शेतकऱ्यांनी एकत्र येऊन सहकारी पद्धतीने साखर कारखाना काढण्याचा ठराव मांडला. या परिषदेचे अध्यक्ष डॉ. गाडगीळ यांनी व उपस्थित शेतकऱ्यांनी या कारखान्याचे मुख्य प्रवर्तक म्हणूक विखे-पाटील यांच्यावरच जबाबदारी टाकली. त्यांनी ही जबाबदारी पार पाडण्यासाठी १९४५ ते १९५० या कालखंडात अतोनात कष्ट घेऊन, गावोगावी व दारोदारी भटकंती करून भागभांडवल जमविले तसेच कारखान्याला शासनाकडून मंजूरी मिळविली. कारखान्याच्या उभारणीसाठी त्यांनी केलेल्या भटकंतीकरिता शेतकऱ्यांचा एकही पैसा खर्च केला नाही. 'परान्न घेणार नाही' अशी त्यांची प्रतिज्ञा होती. त्यामुळे आपली भाकरी ते नेहमी आपल्या कोटाच्या खिशात बाळगत असत. विखे-पाटील यांची साखर कारखाना काढण्याची कल्पना त्यावेळी हास्यास्पद ठरविली गेली.

अशा सर्वस्वी प्रतिकूल परिस्थितीला तोंड देत विखे-पाटील यांनी प्रवरानगर येथे शेतकऱ्यांच्या पहिल्या प्रवरा सहकारी कारखान्याची ३१ डिसेंबर १९५० या दिवशी स्थापना केली आणि या कारखान्यातून साखर उत्पादन सुरू झाले. त्या वेळचे मुंबई राज्याचे वित्त व सहकारमंत्री वैकुंठभाई मेहता यांनी या कारखान्यास शासनाची मान्यता मिळवून देऊन सर्वतोपरीने सहकार्य केले. प्रवरानगराचा हा कारखाना आशिया खंडातील सहकारी तत्त्वावरील अग्रगण्य साखर कारखाना मानला जातो.

पहिली अकरा वर्षे विखे-पाटील यांच्या आग्रहामुळेच डॉ. धनंजयराव गाडगीळ कारखान्याचे अध्यक्ष झाले, तर ते स्वतः उपाध्यक्ष म्हणून काम पहात असत. पुढे ते विखेपाटील प्रवरा सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष (१९६०) व संगमनेर सहकारी साखर कारखान्याचे मुख्य प्रवर्तक व अध्यक्ष (१९६६) झाले.

शेतकऱ्यांच्या सहकारी साखर कारखान्यांची योजना विखे-पाटील यांनी यशस्वी रीत्या राबविल्यामुळे भारत सरकारने त्याचा लाभ आणि माहिती भारतातील विविध प्रतिनिधी आणि अभ्यासू शेतकरी यांना व्हावी, म्हणून अखिल भारतीय सहकारी साखर कारखान्यांची पहिली परिषद १९५६ साली प्रवरानगर येथे भरविली.

प्रवरानगरचा सहकारी साखर कारखाना व विखे-पाटील हे भारतातील सहकारी चळवळीतील कार्यकर्त्यांचे प्रेरणास्थान बनले. अशा प्रकारचे आणखी कारखाने उभे राहण्यासाठी विखेपाटील यांनी अनेक शेतकरी नेत्यांनी प्रोत्साहन दिले. उदा., सांगलीचे वसंतदादा पाटील, वारणानगरचे तात्यासाहेब कोरे, पोहेगावचे गणपतराव ओंताडे, राहुरीचे वाबूराब तनपुरे, अकलूजचे शंकरराव मोहिते, पंचगंगेचे रत्नाप्पा कुंभार, परभणीचे शिवाजीराव देशमुख, इत्यादी. भारताचे पहिले पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांनी स्वतः प्रवरानगरला येऊन विखे-पाटील यांच्या कार्याची प्रशंसा केली.

विखे-पाटील यांनी शेतकऱ्यांना बचतीचे महत्त्वही पटवून दिले. शासनाची अल्पबचत योजना यशस्वी रीत्या राबविल्याबद्दल १९६५मध्ये भारताचे तत्कालीन अर्थमंत्री टी. टी. कृष्णम्माचारी यांनी खास मानपत्र देऊन गौरविले. त्याचप्रमाणे कुटुंबनियोजनाची योजनाही १९५९पासून त्यांनी परिसरात राबविली. या योजनेचे फलित म्हणजे, १९७६ साली ऑक्टोबर महिन्यात प्रवरा हॉस्पिटलमध्ये चार दिवस भरविलेल्या कुटुंबनियोजन शिबिरात ६,२३१ शस्त्रक्रिया यशस्वी रीत्या पूर्ण करण्यात आल्या व त्यातून शस्त्रक्रियांचा जागतिक विक्रम प्रस्थापित झाला.

विखे-पाटील यांनी पुढील सामाजिक. शैक्षणिक संस्थांवर विविध नात्यांनी काम केले : प्रवरा शिक्षणोत्तेजक सहकारी पतपेढीचे संस्थापक व अध्यक्ष (१९५३), अहमदनगर जिल्हा मराठा विद्याप्रसारक समाजाचे अध्यक्ष (१९५३५६), कोपरगाव व कारेगाव सह. साखर कारख्यान्यांचे सन्मानीय संचालक (१९५४), प्रवरा ग्रामीण शिक्षणसंस्थेचे आद्य प्रवर्तक (१९६४), साखर कामगार हॉस्पिटलचे (श्रीरामपूर) अध्यक्ष (१९६८), अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेचे संचालक (१९५८) व अध्यक्ष (१९६८), गोदावरी विकास मंडळाचे सदस्य (१९७१) इत्यादी.


कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या शैक्षणिक कार्याने विखे-पाटील प्रभावित झाले व त्यांनी कर्मवीरांना नगर जिल्ह्यात शैक्षणिक संस्था उभारण्यास पाचारण केले तसेच सर्वतोपरीने साहाय्य केले. ते रयत शिक्षण संस्थेचे संचालक व उपाध्यक्ष (१९७८) होते. ग्रामीण भागातील आरोग्याचे प्रश्न सुटावेत; म्हणून त्यांनी प्रवरा मेडिकल ट्रस्टची स्थापना (१९७४) करून अत्याधुनिक सुविधा असलेले भव्य इस्पितळ लोणीत सुरू केले. त्यांच्या पश्चात त्यांनी स्थापन केलेल्या विविध संस्थांच्या माध्यमांतून अनेक शिक्षणसंस्था- उदा., वैद्यकीय, दंत, परिचालिका, अभियांत्रिकी, तंत्रनिकेतन (मुलांचे व मुलींचे), औद्योगिक प्रशिक्षण संस्था, कला अकादमी तसेच गावोगावी अनेक माध्यमिक विद्यालये इ. संस्था उभ्या राहिल्या. त्यांचे चिरंजीव बाळासाहेब विखेपाटील व नातू राधाकृष्ण विखे-पाटील यांनी समर्थपणे पुढे चालविले आहे.

विठ्ठलराव विखे-पाटील यांनी सहकार, कृषी, औद्योगिक व शैक्षणिक क्षेत्रांत केलेल्या मौलिक कामगिरीबद्दल भारत सरकारने त्यांना १९६१मध्ये पद्मश्री हा किताब दिला, तर पुणे विद्यापीठाने 'डी.लिट्.' (१९७८) व राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठाने 'डॉक्टर ऑफ सायन्स' (१९७९) या पदव्या प्रदान केल्या. लोणी बुद्रुक येथे २७ एप्रिल १९८० रोजी त्यांचे निधन झाले.

**-शंकरराव दिघे**, मराठी विश्वकोश

---

# नाटककार भार्गवराम विठ्ठल वरेरकर उर्फ मामा वरेरकर



३७ नाटके, तीन नाटिका, अनेक कथा, कादंबऱ्या, रहस्यकथा लिहिणारी आणि बंगाली वाङ्मयाचे मराठीत भाषांतर करणारी असामी म्हणजे मामा वरेरकर. मराठी साहित्यशारदेचे दालन समृद्ध करणाऱ्या मामा वरेरकर यांचा २७ एप्रिल हा जयंती दिन. त्या निमित्ताने त्यांचे विविध पैलू उलगडणारा हा लेख...

मामांचा जन्म २७ एप्रिल १८८३ रोजी चिपळूणला झाला. त्यांची जडणघडण मुंबापुरीत झाली आणि त्यांच्या जीवनाची अखेर २३ सप्टेंबर १९६४ रोजी भारताच्या राजधानी दिल्लीत झाली. असे असले तरीही मामा वरेरकरांना मालवणचे मामा वरेरकर म्हटले जाते. याला कारण मामांचे बालपण घडले ते मालवणात. नाटककार म्हणून मामांनी पहिले आठ पृष्ठांचे 'रासक्रीडा' हे नाटक लिहिले तेदेखील मालवणातच आध्यात्मिक ग्रंथांचा अभ्यास करून.

ज्याला एकपात्री नाटक म्हणतात, ते कीर्तन-प्रवचन करायला मामांना रंगमंच मिळाला तोही मालवण मेढामधील मुरलीधर मंदिराचाच आणि नाटकाची ओढ लागली तीदेखील मालवणच्या त्या काळच्या सुप्रसिद्ध कृष्णाबाई प्रासादिक वाईरकर संगीत नाट्यमंडळाच्या तालमी पाहूनच! म्हणूनच नाट्यरसिक मामांना मालवणचे म्हणून ओळखतात असे नव्हे, तर मामांनी मालवणकरांचा स्पष्टवक्तेपणाचा, गप्पा मारण्याचा आणि माणसे जोडण्याचा त्रिगुण संपादित केला होता. म्हणूनच त्यांच्या स्पष्टवक्तेपणाचे उदाहरण ज्ञानपीठ पुरस्कार विजेते वि.स. खांडेकर यांनी एका ठिकाणी नमूद केले आहे. त्यांनाही त्यांच्या स्पष्टवक्तेपणाचा मालवणी तडाखा बसला होता. त्या वेळी खांडेकर 'ज्ञानपीठ'विजेते झालेले नव्हते, तरी समर्थ लेखक होते. ते शिरोड्याच्या इंग्रजी शाळेचे मुख्याध्यापक होते. मामा वरेरकर त्या वेळी राम गणेश गडकरी यांच्यावरएक व्याख्यान देण्याकरिता सावंतवाडीत आले होते. त्याचे वृत्त खांडेकरांनी एका इंगजी दैनिकाला देताना वरेरकरांबद्दल असे लिहिले होते - Famous Marathi Dramatist Varerkar. मामा वरेरकर खांडेकरांना म्हणाले, 'खांडेकर मी नाटककार नाही, मी नाट्यकार आहे' आणि त्या शब्दसृष्टीच्या ईश्वराला त्यांनी नाटककार आणि नाट्यकार याच्यातला फरक समजावून दिला. खांडेकर म्हणतात, 'एका शाळा मास्तराची एका पोस्टमास्तरने घेतलेली ती मालवणी स्पष्टवक्तेपणाची शिकवणीच होती.'

नाट्यकार म्हणून मामांनी सामान्यांचे प्रश्न आपल्या नाटकांतून मांडले. कुंजविहारी (१९०८), हाच मुलाचा बाप (१९१८), संन्याशाचा संसार (१९२०), सत्तेचे गुलाम (१९२२), करीन ती पूर्व (१९२७), सोन्याचा कळस (१९३२), उडती पाखरे (१९४१), सारस्वत (१९४२), जीवा-शिवाजी भेट (१९५०), अ-अपूर्व बंगाल (१९५३), भूमिकन्या सीता (१९५४) आदी नाटकांतून सामान्यांचे प्रश्न रंगभूमीवर आणले. 'हाच मुलांचा बाप'मधून हुंड्याचा प्रश्न, 'संन्याशाचा संसार'मधून पतित परावर्तनाचा प्रश्न, असहकारितेच्या चळवळीवर आधारित 'सत्तेचे गुलाम', मजूर मालकांच्या गिरणगावच्या प्रश्नावर आधारित 'सोन्याचा कळस,' तर सीतेवर झालेल्या अत्याचाराला वाचा फोडण्याकरिता 'भूमिकन्या सीता' ही मामांची नाटके.

मामांनी हाताळलेले प्रश्न अजूनही जिवंत असल्यामुळे त्यांची नाटके चिरंजीव आहेत. पूर्व बंगालातील अत्याचारांवर आधारित 'अ-अपूर्व बंगाल' हे मामांचे नाटक तर इतिहासाची साक्ष देणारे आहे. नाट्यलेखन करताना मामांनी रंगभूमीचा किर्लोस्करकालिनी चेहरामोहरा बदलला. दीर्घकालीन पौराणिक नाटके सर्वसामान्यांच्या प्रश्नांना भिडवून सुटसुटीत केली. दीर्घ स्वगतांना फाटा देऊन आणि अवाजवी संगीताचे स्तोम कमी करून मराठी रंगभूमीला नवीन आयाम दिला. ललित कलादर्श कंपनीचे ते कायमस्वरूपी घरचेच नाटककार होते. श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांना ते गुरुस्थानी मानत. त्यांच्यावर इब्लेन, मेलियर आदी पाश्चात्य नाटककारांचा प्रभाव होता.

बंगाली भाषेतील अनेक कादंबऱ्यांची भाषांतरे त्यांनी मराठीत केली. बंकिमचंद्र, शरच्चंद्र यांची ओळख मराठी रसिकांना त्यांनी करून दिली; पण त्याचबरोबर 'एकविंशती' या रवींद्रनाथ टागोरांच्या २१ कथांच्या भाषांतरित पुस्तकाने टागोरांचे व्यक्तिमत्त्व त्यांनी मराठी प्रांतात फुलविले. मामा वरेरकरांनी संसार की संन्यास (१९११) (सामाजिक प्रश्नांचे विचार), विधवा कुमारी (१९२८) (वैधव्य आलेल्या तरुण निश्चयी कर्तबगार मुलीची चिकाटी), धावता धोटा (१९३३), (गिरणगावातील पहिल्या राजकीय प्रश्नांना आवाज), फाटकी वाकल (ग्राम सुधारणेसाठी खेड्यात जाणाऱ्या तरुणांचे प्रश्न) आदी आपल्या कादंबऱ्यांतून अनेक प्रश्नांना वाचा फोडली. केवळ २० वर्षे पोस्टमास्तर म्हणून नोकरी करून त्यांनी नाट्यलेखनासाठी पोस्टातून निवृत्ती स्वीकारली. अनेक पुरस्कारांनी त्यांचा गौरव करण्यात आला होता. लेखाच्या प्रारंभी वरेरकरांनी नेहरूंना लिहिलेल्या ज्या पत्राचा उल्लेख आहे, त्या पत्राची गुणग्राहक आणि रसिक नेहरूंनी तत्काळ दखल घेतली. तत्कालीन रत्नागिरीचे लोकसभा खासदार मोरोपंत जोशी यांच्याकडून मामांची सर्व माहिती घेतली आणि मामांना राज्यसभेत गुणवंत विद्वान आणि सामाजिक क्षेत्रांत भरीव कामगिरी केलेल्या व्यक्तींना जो मान दिला जातो, तो प्राप्त झाला. मामा १९५६ मध्ये मेंबर ऑफ पार्लमेन्ट (खासदार) झाले.


पुणे येथे (१९३८) मामांना मराठी नाट्यसंमेलनाचे अध्यक्षस्थान भूषविता आले, तर धुळे येथील (१९४४) अखिल भारतीय साहित्य संमेलनाचेही ते अध्यक्ष झाले. १९५१मध्ये मुंबई आकाशवाणी केंद्राकडून आदर्श पुरस्कार जाहीर झाला. १९५९मध्ये राष्ट्रपती राजेंद्रप्रसाद यांच्या हस्ते पद्मभूषण किताबाने त्यांना सन्मानित करण्यात आले. १९६२मध्ये उपराष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् यांच्या हस्ते संगीत नाटक अकादमीची फेलोशिपही त्यांना देण्यात आली. २३ सप्टेंबर १९६४ रोजी त्यांचे निधन झाले.

**-सुरेश ठाकूर**, आचरे, सिंधुदुर्ग

# सातत्याने बदलणाऱ्या हवामानामुळे मत्स्यदुष्काळ

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

राज्याच्या सागरी जलसीमेतील मत्स्यसंपदा कधीकाळी भरभराटीत होती. पण आज परिस्थिती भयावह आहे. हवामानातील सातत्याने होणारे बदल, समुद्रातील मानवी हस्तक्षेप, वाढते जलप्रदूषण आणि परराज्यांच्या ट्रॉलर्समुळे माशांचा साठा झपाट्याने कमी होत चालला आहे. त्यामुळे दिघी, आदगाव, कुडगाव, दिवेआगर, भरटखोल, जीवना, मुळगाव, दांडा कोळीवाडा येथील मच्छीमारांची उपजीविका धोक्यात आली आहे.



मासेमारीसाठी लागणारे डिझेल, बर्फ, जाळी, नौका देखभाल व खलाशी वर्गाचा पगार यासाठीचा खर्च दिवसेंदिवस वाढत चालला आहे, मात्र मासळीचा साठा घटल्याने उत्पन्न जवळपास संपलंच आहे. बहुतांश मच्छीमार आर्थिक अडचणीत अडकले असून बँकेच्या कर्जाच्या हफ्त्यांपासून घरखर्चापर्यंत सर्व जबाबदाऱ्या डोंगरासारख्या उभ्या ठाकल्या आहेत. गुजरात, कर्नाटक येथील हायस्पीड ट्रॉलर्स रात्रीच्या अंधारात महाराष्ट्राच्या सागरी हद्दीत घुसून लाखो रुपयांची मत्स्यसंपत्ती उचलून नेत आहेत. या घुसखोरीवर बंदी कागदावरच राहिली आहे. पारंपरिक मच्छीमारांचा हक्काचं पाण्यात हिरावला जात आहे.

अनेक मासे – घोळ, जिताडा, शेवंड, सुरमई, मांदेली, कोळंबी, पापलेट, बोंबील इत्यादी प्रजाती आता समुद्रातून हद्दपार झाल्यासारख्या आहेत. अरबी समुद्रातील झिरो ऑक्सिजन झोन आणि जागतिक तापमानवाढीमुळे माशांची प्रजननक्षमता आणि वंशवृद्धीवर परिणाम झाला आहे. काही प्रजाती स्थलांतरित होत असून काहींचा समुद्रातून नामशेष होण्याचा धोका आहे.

या गंभीर परिस्थितीतही शासनाची दखल अपुरी व वेळेवर न घेणारी आहे. मच्छीमार समाजाने डिझेल अनुदान, बर्फ अनुदान, मासेमारी सवलती, खलाशी वर्गाच्या पगारासाठी निधी, मासेमारीसाठी विशेष सॉफ्ट लोन योजना आणि आर्थिक पॅकेज जाहीर करण्याची मागणी केली आहे.

शासनाने यावर तातडीने लक्ष घालून, मच्छीमारांना विशेष संरक्षण, आर्थिक मदत, धोरणात्मक योजना आणि सागरी हद्दीतील घुसखोरीवर कठोर कारवाई करावी, अशी सर्व मच्छीमार समाजाची एकमुखी मागणी आहे.

**मासेमारी म्हणजे हजारो कुटुंबांची ओळख**

श्रीवर्धन तालुक्यातील अनेक कोळीवाड्यांमध्ये तरुण पिढी मासेमारी सोडून स्थलांतर करत आहे. कारण या व्यवसायात आता न भविष्य आहे, न भरवसा. मासेमारी ही केवळ उद्योग नसून संस्कृती, जीवनशैली आणि हजारो कुटुंबांची ओळख आहे.

# कोल्हारे येथील जुगार अड्ड्यावर धाड; रोकड जप्त

**नेरळ : प्रतिनिधी**

नेरळ पूर्व परिसरात असणाऱ्या जुगार अड्ड्यावर नेरळ पोलिसांनी धाड टाकली आहे. या धाडीत पोलिसांना वीस हजाराची रोकड सापडून आलेली आहे. बेकायदेशीरपणे हा जुगार अड्डा चालवला जात होता.याची पोलिसांना माहिती मिळाली होती.त्यानुसार नेरळ पोलिसांनी ही धडक कारवाई केलेली आहे.

नेरळ पोलीस ठाणे हद्दीत येत असलेल्या नेरळ पूर्व परिसरातील कोल्हारे ग्रामपंचायत हद्दीत हा जुगार अड्डा अवैद्य रित्या सुरू होता. याबाबत नेरळ पोलिसांना त्यांच्या खबऱ्याच्या माध्यमातून पोलिसांना माहिती मिळाली. २४ एप्रिल रोजी दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास पोलिसांनी विनापरवाना बेकायदकशीर सुरू असलेल्या या जुगार अड्ड्यावर अचानक धाड टाकली यावेळी येथे पोलीस येताच जुगार खेळणाऱ्यांची एकाच तारांबळ उडाली आणि पैसे जागेवरच सोडून पळ काढला.

पोलिसांनी जुगार चालवणाऱ्या नेरळ येथील व परिसरातील दोघांवर कारवाई केली असून यामध्ये पोलिसांना एकुण रोख रक्कम. १९२०० रुपये सापडून आले आहेत. या जुगार अड्ड्यावर सोरट पद्धतीने जुगार खेळवला जात होता. याबाबत नेरळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस हवालदार लोखंडे हे करीत आहेत.

नेरळ शहरासह नेरळ पूर्व परिसरातदेखील विनापरवाना अवैद्य व्यवसाय हा तेजस सुरू असल्याचे दिसून येत आहे. यामध्ये कल्याण मटका तर तीन पत्ते जुगार हा सर्रास खेळवला जात असून. तरुण पिढी यामध्ये बरबाद होताना दिसत आहे. त्यामुळे नेरळ पोलीस असे आणखी जुगार अड्डे शोधून कारवाई करणार का हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# पहलगाम हल्ल्याचा मुरूडमध्ये निषेध

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तालुका शिवसेना शिंदे गटाच्या वतीने जम्मू-कश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या भ्याड दहशतवादी हल्ल्याचा निषेध करून मृत्यूमुखी पडलेल्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.



या वेळी हल्ल्याचा निषेध करण्यासाठी कार्यकर्त्यांनी आपल्या हातात निषेधाचे फलक धरुन व मौन पाळुन आपला संताप आणि शोक व्यक्त केला. तीव्र शब्दांत निषेध करून पाकिस्तानच्या झेंडाला चप्पलाचे जोडे मारुन पायाखाली तुडवून झेंडाला जाळण्यात आले. दहशतवाद्यांच्या कृत्याचा तीव्र निषेध करून पाकिस्तान मुर्दाबाद च्या जोरदार घोषणा दिल्या.

या वेळी शिवसेना उपजिल्हाप्रमुख भरत बेलोसे, महिला जिल्हा संघटिका तृप्ती पाटील, शिवसेना तालुका प्रमुख ऋषिकांत डोंगरीकर निलेश घाटवल, भगिरथ पाटील, शहर प्रमुख- संदिप पाटील, कामगार संघटना मुरूड तालुका अध्यक्ष-दिनेश मिणमिणे, माजी नगरसेविका युगा ठाकूर, माजी नगराध्यक्षा-स्नेहा पाटील, श्रीकांत सुर्वे, संगिता परकर, स्वप्ना पाटील,राजपुरी गण संपर्क प्रमुख -जिविता मिणमिणे, अरविंद गायकर,नौनिता कर्णिक, मंदा ठाकूर, विरेंद्र भगत, राहिला खान, मंदार दांडेकर, सागर चौलकर, विजय पाटील, नयन कर्णिक, श्रीकांत खोत, ओम पाटील, नगमा खानजादे, निलेश ताबडकर, जमिर फत्ते, पांडुरंग आरेकर, राकेश मसाल, उत्तम पाटील, मनोहर वासकर, विजय ठाकूर, भाऊ पाटील, अमोल लाढ, रुपेश भोसले, स्पनिल कवळे आदिंसह शिंदे गट शिवसेनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

# माणगावात मशाल मोर्चा

**माणगाव : प्रतिनिधी**

काश्मीरमध्ये दहशतवाद्यांनी पर्यटकांवर केलेल्या हल्ल्याविरोधात माणगाव शहरात बालाजी कॉम्प्लेक्स ते वीर शहीद यशवंतराव घाडगे स्मारक असा सर्वपक्षीय मशाल मोर्चा भाजप युवा मोर्चा माध्यमातून काढण्यात आला.



या मोर्चाला माजी नगराध्यक्ष आनंद यादव, भाजप युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष निलेश थोरे, शिवसेना तालुकाप्रमुख गजानन अधिकारी, अल्ताफ धनसे, मोर्बा सरपंच शौकत रोहेकर यांच्यासह माणगाव तालुक्यातील सर्वपक्षीय पदाधिकारी आणि माणगावकर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या पर्यटकांना श्रद्धांजली वाहण्यात आली. या वेळी अनेकांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी भाजप युवा मोर्चा अध्यक्ष निलेश थोरे म्हणाले की, घडलेली घटना ही भारतीयांसाठी अत्यंत निंदनीय आहे. हा हल्ला ज्यांनी केला व त्यांच्या मागचे सूत्रधार यांना शोधून काढून कठोरात कठोर शिक्षा करावी.

हल्लेखोरांच्या सात पिढ्यांना ही शिक्षा लक्षात राहावी, अशी शिक्षा भारत सरकारने करावी. या प्रमुख मागणीसाठी सर्वपक्षीय मशाल मोर्चा काढण्यात आला आहे.

# कर्जतमध्ये मूक मोर्चा; महिलांचा लक्षणीय सहभाग

**नेरळ : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील सकल हिंदू समाजच्या वतीने पेहेलगामच्या घटनेत मृत झालेल्या नागरिकांना श्रद्धांजली वाहण्यात आली होती.तर तालुक्यातील कर्जत शहर, नेरळ शहर तर ग्रामीण भागात येत असलेल्या कशेळे परिसरात सकळ हिंदू समाज या घटनेचा निषेधार्थ रस्त्यावर उतरला होता.




कर्जत येथे टिळक चौकात सकल हिंदू समजाकडून घटनेचा तीव्र निषेध नोंदवण्यात आला होता तर नेरळ शहरातील हिंदू बांधवांनी श्री मारुती मंदिर येथून मुक मोर्चाला सुरुवात केली होती. हा मोर्चा मुक नव्हे तर आक्रोश करीत महिलांनी आपल्या तीव्र शब्दात घटनेचा निषेध केला.

या वेळी पाकिस्तान मुर्दाबादच्या घोषणादेखील देण्यात आल्या.हा भ्याड हल्ला पाकिस्तानच करू शकतात म्हणून रोष व्यक्त केला जात होता. मारुती मंदिर ते नेरळ रेल्वे स्थानक परिसर असा मुख्य बाजारपेठेतून हा मोर्चा काढण्यात आला होता.

या मोर्चात सामाजिक कार्यकर्ते रामदास घरत, भास्कर पाटील, उदय पाटील, दिनेश रसाळ, राजाराम शेळके, सचिन राणे, राजू हरपूडे, गजानन भोईर, मारुती धुळे. दिनेश हरपूडे, रमेश मते तर परिसरातील शेकडो हिंदू नागरिक रस्त्यावर उतरली होती. या मोर्चात रामदास घरत, उदय पाटील, भास्कर पाटील तसेच राजाराम शेळके यांनी भ्याड हल्ल्याचा निषेध नोंदवला.

# कृषी विभागाच्या विविध योजनांचा पाहणी दौरा

**माणगाव : बातमीदार**

रायगड जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित बडे व कृषी विकास अधिकारी पवनकुमार नजन यांनी २३ एप्रिल २०२५ रोजी जिल्हा कृषी विभागाच्या कृषी अधिकारी व कृषी विस्तार अधिकारी यांच्यासह माणगाव तालुक्यातील जि.प. सेस योजना सन २०२४-२५ मधील तालुक्यात लाभ दिलेल्या शेतकऱ्यांच्या शेतावर जाऊन प्रत्यक्ष पाहणी करून मार्गदर्शन केले.



तलाशित प्रभागातील सचिन नाडकर राहणार निवी मुठवली यांना देण्यात आलेल्या ऑइल इंजिनची पाहणी तसेच सचिन नाडकर यांनी लागवड केलेल्या फुल शेतीची पाहणी सत्यजित बडे यांनी केली. आमच्या जि.प. योजनेचा लाभ कसा झाला व आणखी तुम्हाला कृषी कृषी विभागामार्फत काय आवश्यक आहे जेणेकरून तुमच्या आर्थिक जीवनमान उंचावेल असे यावेळी बडे यांनी सांगितले असता जि. प. विभागाच्या योजनेचा आम्ही चांगल्या प्रकारे लाभ घेतलेला असून त्यातून आमच्या शेतीमध्ये भाजी मळ्या करता ऑइल इंजिन, पाईपलाईन तसेच रात्रीच्या वेळी उजेडाची गरज असते, म्हणून सौर दीप संचदेखील मिळालेला आहे. त्यामुळे कृषी विभागाचे सहकार्य आम्हाला नेहमी मिळत असल्याचे सचिन नाडकर यांनी सांगितले.

निजामपूर विभागातील शेतकरी संजय रणपिसे यांच्या शेतातील बायोगॅस सयंत्राची पाहणी पवनकुमार नजान यांनी केली असता सुरेखा रणपिसे यांनी सांगितले की, गेले चार वर्ष आम्ही बायोगॅसचा वापर करीत आहोत. त्यामुळे आम्हाला सिलेंडर विकत घेण्याची आवश्यकता नाही.

बोंडशेत येथील उच्चशिक्षित युवा प्रगतशील शेतकरी जगदीश मानकर यांच्या शेतीवर कृषी अधिकारी यांनी सोलार कुंपण, बायोगॅस सयंत्र, कुक्कुटपालन, भाजीपाला शेतीची पाहणी केली. जगदीश मानकर या शेतकऱ्यांनी उच्चशिक्षित असूनही शेतीमध्ये नवनवीन प्रयोग करून चांगले अर्थाजन करून स्वतःची पिकअप महिंद्रा गाडी घेतली आहे. त्यामुळे शेतमाल वाहतुकीची अडचण राहिलेली नसल्याचे मानकर यांनी सांगितले. श्री. मानकर यांनी केलेल्या शेतीतील कामासंदर्भात कृषी विकास अधिकारी यांनी समाधान व्यक्त केले.

अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित बडे, कृषी विकास अधिकारी पवनकुमार नजान, कृषी विभागातील सहकारी जिल्हा कृषी अधिकारी आकाश यादव, कृषी अधिकारी वि.घ.यो. निकिता सूर्यवंशी, कृषी अधिकारी मिलिंद चौधरी, विस्तार कृषी अधिकारी राजेश घरत, रंजीत लवटे, अशोक मारकड, प्रकाश सरतापे, शिवदत्त परजणे यांच्यासह शेतकऱ्यांच्या थेट बांधावर जाऊन भेट दिल्यामुळे शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले.

# रोह्यात विविध विकासकामांचे भूमिपूजन

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा अष्टमी नगर परिषदेच्या भुवनेश्वर येथील जागेमध्ये ओएनजीसी सीएसआर निधीमधून क्रिकेट मैदानाचे विकास या कामाचे व रोहा अष्टमी नगर परिषद हद्दीतील मुख्य रस्त्यापासून एमआयडीसी बायपासपर्यंत मच्छीमार्केट पर्यंतचा रस्ता तयार करणे या कामाचे भुमीपुजन खासदार सुनील तटकरे यांच्या हस्ते करण्यात आले.



ओएनजीसी सीएसआर निधीमधून भुवनेश्वर येथील क्रिकेट मैदानाचे विकास होणार असून या मैदानाच्या कामाची पाहणी खासदार सुनील तटकरे यांनी शुक्रवारी सायंकाळी केली

या वेळी राष्ट्रवादी प्रदेश सरचिटणीस विजयराव मोरे, जिल्हा सरचिटणीस सुरेश मगर, तालुका अध्यक्ष विनोद पाशिलकर, मुख्याधिकारी अजयकुमार एडके, माजी नगराध्यक्ष संतोष पोटफोडे, समिर शेडगे, सरपंच रामाशेठ म्हात्रे, माजी उपनगराध्यक्ष महेश कोलाटकर, राजेंद्र जैन, अहमद दर्जी, महेश सरदार, जितेंद्र पडवळ, समिर सकपाळ, मयुर दिवेकर, राष्ट्रवादी शहर अध्यक्ष अमित उकडे, चंद्रकांत पार्टे, राकेश जैन, हर्षद साळवी, सागर बोबड, संकेत देशमुख, मयुर पायगुडे, निलेश शिर्के, विशाल शेलार आदी उपस्थित होते.

या वेळी चर्चा खासदार सुनील तटकरे यांनी सात कोटींचा पहिला टप्पा मैदान विकसित करण्यासाठी आले आहे. या ठिकाणी वॉकींग ट्रॅक, कायमस्वरुपी लाईट, बॉडमिंटन, कबड्डी मैदान होणार आहे.

# वाढत्या उष्णतेमध्ये नागरिकांचा थंडपेयांकडे ओढा

**तळा : प्रतिनिधी**

वाढत्या उष्णतेमुळे तळा बाजारपेठेत थंडपेयांना मागणी वाढली असून उष्णतेमध्ये शरीराला थंडावा देण्यासाठी नागरिकांची पावले थंडपेयांकडे वळली आहेत. मार्च महिन्याच्या सुरुवातीपासूनच उष्णतेचे प्रमाण वाढले असल्याने या उष्णतेपासून वाचण्यासाठी नागरिक विविध उपाययोजना करत आहेत.

शरीराला थंडावा देण्यासाठी नागरिकांकडून थंडपेयांना पसंती अधिक मिळत आहे. यासाठी तळा बाजारपेठेत संत्री, मोसंबी, अननस, लिंबू सरबत, कोकम सरबत, यांसारखी विविध थंडपेये विक्रीसाठी उपलब्ध झाली आहेत, मात्र गेल्या वर्षीच्या तुलनेत यावर्षी या थंडपेयांच्या किमतीत वाढ झाली असून वाढलेल्यामहागाईचा फटका थंडपेयांना देखील बसला असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. पाटील ज्यूस सेंटर येथे चौकशी केली असताना लिंबू सरबत फुल ३० रू, अर्धा २०रु. पायनापल ज्यूस फुल ४० रु. तर अर्धा २५ रु. कालाखट्टा फुल ४० रु. तर अर्धा २५रु. असे दर असल्याचे सांगितले.

पुर्वीच्या काळात घरांच्या ओटीवर उन्हाळ्यात पाण्याने भरलेले माठ ठेवले जात होते. आता मात्र ते दुरापास्त झाले आहे.




## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **रोहिदास शंभू गावंड व इतर** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

मिळकतीचे वर्णन : मौजे : सारडे (५५३३४३)
(PU-ID : 22792198391), तालुका-उरण, जिल्हा-रायगड

| गट क्रमांक | भूधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १८२/६ खाते क्रमांक : ३२२ | १ | ०.२५.६० पो.ख. ०.००.७० **एकुण ०.२६.३०** | ५.८७ |
| **एकुण क्षेत्र ०.२६.३० गुंठे** | | | |

वर नमुद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून **१४ दिवसांचे** आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत. व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**दिनांक : २६/०४/२०२५**

**सही/-**
**ॲड. निलेश बा. झंजाड**

बी-१०४ सफायर सी.एच.एस. भूखंड क्रमांक - ३३/३४,
सेक्टर २२, कामोठे, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड -४१०२०६
मो. क्र. ९९२०४७५८०१



## जाहिर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसी द्वारे कळविण्यात येते कि,

ज्याअर्थी मौजे दुंदरे, तालुका पनवेल, जिल्हा रायगड येथील खालील वर्णनाची शेतजमीन मिळकत सदर मिळकतीचे मालक **१) श्रीमती कविता चंद्रशेखर राणे** रा. शिवाजी रोड, गुणे हॉस्पिटल जवळ, इंदिरा कॉम्प्लेक्स, श्री सदन सोसायटी, फ्लॅट नं. २/५, पनवेल, ता पनवेल, जिल्हा रायगड आणि **२) श्रीमती विनया विठ्ठल दुखंडे** रा. १०५, कृष्ण विहार हौ. सोसा. डॉ एस. एस. राव रोड, हिला टोवर जवळ, लालबाग, परळ, मुंबई-१२ यांचे कडून आमचे अशील **१) श्री. कवीश्वर पुरुषोत्तम सदावर्ते** आणि **२) श्री. पियुष कवीश्वर सदावर्ते** दोघेही रा. टाईप ई-१, बिल्डींग नं. १८, रूम नं. सी-९, सिडको कॉलनी, न्यू पनवेल, ता. पनवेल, जिल्हा- रायगड. यांनी कायम खरेदीने घेण्याचे ठरवले आहे.

**शेत जमीन मिळकतीचे वर्णन**
**मौजे दुंदरे, तालुका- पनवेल, जिल्हा रायगड**

| भूधारण पद्धती | सर्वे नं. | क्षेत्र | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| वर्ग-१ | ३७/२ | लागवड योग्य क्षेत्र - | ०-०७-४० | ०.३४ |
| | | पोट-खराब क्षेत्र - | ०.०४.५० | |
| | | एकूण - | ०-११-९० | |

त्याअर्थी सदर मिळकतीमध्ये अगर तिचे कोणत्याही भागावर कुणाही

ति-हाईतांचे गहाण-दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, एम.ओ.यू, हुकुमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा अगर तत्सम कोणतेहि हक्क हितसंबंध निगडीत -असल्यास अगर सदर व्यवहारास कुणाचीही कोणत्याही प्रकारे हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरूर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवरील १) श्रीमती कविता चंद्रशेखर राणे आणि २) श्रीमती विनया विठ्ठल दुखंडे यांचे मालकी हक्क -हितसंबंध निर्वेध व बोजारहित आहेत असे समजुन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राहय धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

**पनवेल**
**दि. २६/०४/२०२५**

**सही/-**
**ॲड. नागेश अरविंद हिरवे**

कार्यालयीन पत्ता: - रूम नं-१, तळ मजला, ए/५३/५,
सेक्टर- १३ सिडको कॉलनी, नवीन पनवेल, जिल्हा: रायगड.

# उरण मार्गावर विद्युत बस सुरू

**उरण : वार्ताहर**

एनएमएमटी व्यवस्थापनाने उरणच्या मार्गावर विद्युत बस सुरू करण्याची मागणी प्रवाशांनी केली होती. त्यानुसार मंगळवार (दि. २२) पासून उरण ते कोपरखैरणे या मार्गावरील विद्युत बस सुरू झाली आहे. त्यामुळे ऐन उन्हाळ्यात उकाड्याने त्रस्त झालेल्या प्रवाशांना काहीसा दिलासा मिळाला आहे.

उरणमध्ये उरण ते नेरूळ/बेलापूर ही लोकल सेवा सुरू झाली असली तरी अनेक प्रवासी हे एनएमएमटी बसने प्रवास करीत आहेत. त्यामुळे नवी मुंबई महापालिकेच्या एनएमएमटी बस सेवेतून प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या वाढू लागली आहे, मात्र उरणमध्ये येणाऱ्या बस या नादुरुस्त व जुन्या आहेत. त्यामुळे प्रवाशांना याचा त्रास सहन करावा लागत आहे. उरणमधून कोपरखैरणे आणि कळंबोली आशा दोन बस मार्गावर येथील प्रवासी प्रवास करीत आहेत. यासाठी वापरण्यात येणाऱ्या बसेसची दुरवस्था झालेली आहे.



एनएमएमटी बस सेवा ही उरणमधील महिला, ज्येष्ठ नागरिक आणि विशेषतः नवी मुंबईत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाचे ठरत आहे. काही महिने बंद असलेल्या ही सेवा पूर्ववत सुरू करण्यात आली आहे, मात्र या बसची संख्या अपुरी आहे. त्यामुळेही प्रवाशांना याचा त्रास सहन करावा लागत आहे.

या मार्गावरील बस संख्येत ही वाढ करण्यात यावी त्याचप्रमाणे विद्युत बस सेवा ही सुरू करण्यात यावी, अशी मागणी उरणमधील प्रवाशांनी केली होती. एनएमएमटी बससेवा ही शहरातील प्रवाशांसाठी महत्त्वाची आहे. ही सेवा काही महिने बंद करण्यात आली होती. ही बस सेवा सुरू करावी या मागणीसाठी आंदोलन ही करण्यात आले होते. त्याचप्रमाणे नवी मुंबई महापालिका आयुक्त, परिवहन विभाग आदीना निवेदने ही देण्यात आली होती.

वारंवार मागणी आणि पाठपुरावा केल्यानंतर ही सेवा पूर्ववत करण्यात आली तर दुसरीकडे जुईनगर ते कोप्रोली वशेणी ही वातानुकूलित सेवा खोपटे येथील अपघाता नंतर बंद करण्यात आली होती. ती पुन्हा सुरू करण्याची मागणी येथील सामाजिक संस्था आणि नागरिकांनी केली आहे.

## शिरवणेतील मलनिस्सारण वाहिन्या बदलण्याची मागणी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

शिरवणेगाव व गावठाण मधील जीर्ण आणि नादुरुस्त मलनिस्सारण वाहिन्या नवी मुंबई मनपाने बदलाव्यात, अशी मागणी वर्षानुवर्षे केली जात आहे. मागील २२ वर्षांपूर्वी टाकण्यात आलेल्या या मलनिस्सारण वाहिन्या ठिकठिकाणी तुटलेल्या व गांजलेल्या अवस्थेत असून त्याचा परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होत असून नागरिक त्रस्त आहेत.

शिरवणेगाव आणि गावठाणमधील मलनिस्सारण वाहिन्या मागील २२ वर्षांपूर्वीच्या आहेत. त्यामुळे सद्यस्थितीत त्या ठिकठिकाणी नादुरुस्त अवस्थेत असल्याचे पहावयास मिळते. बऱ्याच भागातील वाहिन्या गंजलेल्या आणि तुटलेल्या अवस्थेत असून त्यातुन दुर्गंधीयुक्त उग्र वास येत असतो. नागरिकांना विविध अजाराने ग्रासले असून दररोजच्या येथील दुर्गंधीयुक्त उग्र वासाने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. सद्यस्थितीत असलेल्या या मलनिस्सारण वाहिन्या कमी व्यासाच्या असल्याने मल तुंबण्याचे प्रकार वारंवार होत असून या बदलण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे

शिरवणे गाव विस्तारले आहे. घरांची संख्या चौपट झाली आहे, मात्र पूर्वीचीच मलनिस्सारण वहिनी असल्याने ती तुंबण्याचे प्रकार वारंवार होत आहेत. काही चेंबर घुशीने पोखरले असून त्यात गाळ साचल्याने दिसून येते. त्याची साफसफाई करणे मुश्किल होते. पूर्वीची जुनाट व जीर्ण अवस्थेतील मलनिस्सारण वाहिनी बदलून नवीन मोठ्या व्यासाची टाकावी, अशी मागणी होत आहे.

> शिरवणेगावातील मलनिस्सारण वाहिन्या शक्य त्या ठिकाणी बदलण्याचे काम वेळोवेळी करत आहोत. नवी मुंबईतील बहुतांश गावात ही समस्या आज गंभीर बनली आहे. नवीन मोठ्या व्यासाच्या वाहिनी टाकावी यासाठी पाठपुरावा सुरु आहे.
>
> **–माधुरी सुतार,** माजी नगरसेविका

> शिरवणे येथील नागरिकांच्या मलनिस्सारण बाबत तक्रार आल्यास त्याचे निराकरण केले जाते. मोठ्या व्यासाच्या नवीन मलनिस्सारण वाहिन्या टाकण्याचे मनपाचे प्रायोजन आहे.
>
> **–महेश बाविस्कर,** अभियंता, नवी मुंबई मनपा

## मेडिकव्हर हॉस्पिटलच्या आवारात वृक्ष लागवड





**नवी मुंबई : बातमीदार**

दरवर्षी २२ एप्रिल रोजी जागतिक वसुंधरा दिवस साजरा केला जातो. पर्यावरण रक्षणाची जाणीव करून देणे आणि पर्यावरणाचे नुकसान होण्यापासून कसे वाचवता येईल यामागचा मुख्य उद्देश असून खारघरच्या मेडिकव्हर हॉस्पिटलने रुग्णालयाच्या परिसरात वृक्षारोपण मोहीम राबविली.

या उपक्रमातंर्गत रुग्णालयाच्या वतीने रुग्णालय परिसरात ८० हून अधिक झाडे लावली. या उपक्रमात रुग्णालयातील प्रत्येक विभागप्रमुखांचा सक्रिय सहभागी झाले असून, वृक्षारोपणाबरोबरच त्यांचे संगोपन आणि काळजी घेण्याची प्रतिज्ञा देखील याठिकाणी घेण्यात आली.

मेडिकव्हर हॉस्पिटल तंर्गत वृक्षारोपणाची मोहीम राबवित समाजामध्ये पर्यावरण विषयक जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला आल्याची प्रतिक्रिया मेडिकव्हर हॉस्पिटल्समधील महाराष्ट्र आणि कर्नाटक प्रदेशाचे प्रादेशिक संचालक नीरज लाल यांनी व्यक्त केली.

## परिवहन विभागाच्या सेवांचा लाभ घेण्याचे आवाहन

**रायगड : रामप्रहर वृत्त**

राज्यातील नागरिकांना राज्य शासनातर्फे देण्यात येणाऱ्या सेवा पारदर्शक व कालबध्द पध्दतीने देण्याकरिता महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ पारित करण्यात आला असून हा अधिनियम दि.२८ एप्रिल २०१५ पासून अंमलात आला आहे. परिवहन विभागामार्फत देण्यात येणाऱ्या सेवांपैकी एकूण ११५ सेवा सदर अधिनियम अंतर्गत येणाऱ्या या सेवांचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन सहा.प्रादेशिक परिवहन अधिकारी पनवेल निलेश धोटे यांनी केले आहे.

सर्व सेवा परिवहन विभागाच्या https://parivahan.gov.in/ या संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल. तसेच परिवहन विभागामार्फत दिल्या येणाऱ्या सेवांपैकी एकूण ८९ सेवा फेसलेस पध्दतीने सुरू करण्यात आल्या असून, सदर सेवांसाठी नागरिकांना कार्यालयात येण्याची आवश्यकता नसून, परिवहन विभागाच्या https://parivahan.gov.in/ या वेबसाईटवर नागरीक आपला अर्ज दाखल करून परिवहन विभागासंबंधीत कामकाज करून घेवू शकतात.

## वशेणी येथे राधाकृष्ण यात्रोत्सव

**उरण : बातमीदार**

उरणपूर्व विभागातील मानाची समजली जाणारी वशेणी गावातील श्री.राधाकृष्ण यात्रोत्सव सोहळा २९ व ३० एप्रिल रोजी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे.

या यात्रोत्सवा करिता मोठ्या प्रमाणात उपस्थित राहुन कार्यक्रमाची शोभा वाढवावी, अशी विनंती मंदिर कमिटी अध्यक्ष ॲड. गुलाबराव गावंड व पालखी कमिटी अध्यक्ष महेंद्र उमाजी पाटील, उपाध्यक्ष कुंजवी म्हात्रे खजिनदार विक्रांत म्हात्रे यांनी केली आहे. या यात्रेत ज्येष्ठ, महिला व तरुणाईचा जल्लोष मोठ्या प्रमाणात दिसेल, अशी माहिती सुनील पाटील यांनी दिली आहे.

## जागतिक पुस्तक दिनानिमित्त तळोजा कारागृहात ४०० पुस्तके भेट




**मोहोपाडा : प्रतिनिधी**

जागतिक पुस्तक दिनानिमित्त तळोजा मध्यवर्ती कारागृहात मराठी साहित्य संस्कृती व कला मंडळ संचलित प्रा. माणिकराव कीर्तने वाचनालय व टाऊन लायब्ररी यांच्या वतीने एक विशेष उपक्रम राबवण्यात आला. या उपक्रमाअंतर्गत कारागृहातील बंदी बांधवांच्या वाचनालयासाठी ४०० पुस्तके भेट म्हणून प्रदान करण्यात आली.

या कार्यक्रमास कारागृह अधीक्षक प्रमोद वाघ यांनी विशेष उपस्थिती लावून उपक्रमाचे मनःपूर्वक कौतुक केले. अतिरिक्त अधीक्षक गोविंद राठोड, उपअधीक्षक अतुल काळे व वरिष्ठ तुरुंग अधिकारी राहुल झुटाळे यांनी पाहुण्यांचे स्वागत करत अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले.

मराठी साहित्य संस्कृती व कला मंडळाचे अध्यक्ष सुभाष कुलकर्णी यांनी बंदी बांधवांना वाचनाचे महत्त्व समजावले व सकारात्मक विचारसरणी जपण्याचा संदेश दिला. उपाध्यक्ष रविंद्र नेने यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांची अंदमान कारागृहातील लेखनकथा सांगून प्रेरणा दिली. उपाध्यक्षा अश्विनी बाचलकर यांनी वाचनातून होणाऱ्या वैचारिक समृद्धीवर भर देत ज्ञानदान हाच श्रेष्ठ दान या संकल्पनेवर भाष्य केले.

जिल्हा ग्रंथालय अधिकारी,ठाणे प्रशांत पाटील यांनी बंदी बांधवांना मोफत पुस्तके उपलब्ध करून दिली जाणार असल्याचे सांगितले. कार्यक्रमात नवी मुंबईतील युवा कवी जितेंद्र लाड व वैभव वऱ्हाडी (रेडिओ,आरजे) यांनी कविता सादर करून उपस्थितांना विचारप्रवृत्त करणारा संदेश दिला. एका बंदी बांधवाने स्वतः लिहिलेली हिंदी कविता सादर करत भावनांना वाट मोकळी करून दिली. तर कारागृह शिपाई नवनाथ सावंत यांनी आई या विषयावर भावस्पर्शी कविता सादर केली.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कारागृहातील शिक्षक नामदेव शिंदे यांनी केले. हा उपक्रम म्हणजे विचारांची देव–घेव घडवून आणणारा एक आशयघन व सृजनशील प्रयत्न ठरला. ग्रंथसंपदेच्या माध्यमातून बंदी बांधवांच्या जीवनात नवचैतन्य निर्माण करण्याचा हा स्तुत्य उपक्रम भविष्यातही सातत्याने राबवण्यात येणार असल्याचे मंडळातर्फे सांगण्यात आले.ही सर्व पुस्तके कारागृहातील पुस्तके नोंदणी करून वितरित करणारे शिक्षक तागड यांच्याकडे सुपूर्द करण्यात आली.



## डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी केली नवी मुंबईतील रुग्णालयांची पाहणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी आपल्या राज्यव्यापी दौऱ्याचा प्रारंभ गडचिरोलीपासून करत नवी मुंबईतील विविध महत्त्वाच्या रुग्णालयांना बुधवारी (दि.२३) भेटी दिल्या.

एमजीएम हॉस्पिटल (कामोठे), क्रिटी केअर (कामोठे), आशा हॉस्पिटल (कळंबोली), मिलेनियम हॉस्पिटल (उलवे) आणि सत्य साई संजीवनी बाल रुग्णालय (खारघर) या ठिकाणी त्यांनी आयुष्मान भारत व महात्मा फुले जनआरोग्य योजनेंतर्गत रुग्णांना मिळणाऱ्या मोफत सेवा प्रत्यक्ष पाहिल्या.

डॉ. शेटे यांनी उत्कृष्ट सेवा देणाऱ्या रुग्णालयांचे कौतुक करत त्यांच्या कार्यकर्तृत्वाचे विशेष अभिनंदन केले. त्याच वेळी, सेवा गुणवत्तेत त्रुटी आढळलेल्या संस्थांवर तत्काळ कारवाईचे स्पष्ट निर्देश दिले.

खारघरमधील सत्य साई संजीवनी बाल रुग्णालयातील सेवाभावाने डॉ. शेटे भारावून गेले. हे महाराष्ट्रातील एकमेव बाल रुग्णालय आहे जेथे हृदयविकारग्रस्त बालकांसाठी नो बिल काउंटरच्या माध्यमातून संपूर्णपणे मोफत सेवा दिल्या जातात. देशभरातील गरजू बालकांसाठी येथे राहण्यापासून ते उपचारांपर्यंत सर्व सेवा निशुल्क आहेत.

या दौऱ्यादरम्यान त्यांनी नर्सिंग क्षेत्रात प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींशीही संवाद साधला. सिर्फ दिल, बिना बिल हे रुग्णालयाचे ब्रीदवाक्य केवळ शब्द नाही, तर मानवतेचा सर्वोच्च आदर्श आहे, असे सांगत त्यांनी महाराष्ट्रातील आरोग्यसेवेत अशा संस्थांचे योगदान अभिमानाने अधोरेखित केलं.

या वेळी तालुका आरोग्य अधिकारी, डॉ. अपर्णा पवार, पनवेल महानगरपालिका आरोग्य अधिकारी, डॉ. मनीषा चांडक, जिल्हा समन्वयक डॉ. क्षमा पलपटकर व इतर अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

## निवडक



### राजिपतर्फे रमाकांत मांडेंना ई–रिक्षा

**मोहोपाडा :** रसायनीतील काळणवाडी येथील रमाकांत मोतीराम मांडे यांना दिव्यांग कल्याण विभाग रायगड जिल्हा परिषद, अलिबाग यांच्या वतीने ई रिक्षा मिळाली. हि ई रिक्षा मोहोपाडा ग्रामपंचायत कार्यालयासमोर उमा मुंढे सरपंच यांच्या हस्ते देण्यात आली. रमाकांत मांडे यांना ई रिक्षा मिळाल्याने त्यांना स्वयंरोजगार प्राप्त करता येणार आहे. त्यांना रायगड जिल्हा परिषदेकडून ई रिक्षा मिळाल्याने रमाकांत मांडे यांच्या कुटूंबात आनंदाचे वातावरण आहे. या वेळी ग्रामपंचायत उपसरपंच, सर्व सन्माननीय सदस्य, सदस्या, ग्रामपंचायत अधिकारी वैभव बाळकृष्ण पाटील व ग्रामस्थ व ग्रामपंचायत कर्मचारी उपस्थित होते.

### कर्करोग तपासणीला प्रतिसाद

**नवी मुंबई :** पीएसएम असोसिएशन फॉर एज्युकेशन अँड सोशल वेलफेअर आणि डॉ. प्रीती पांडे यांच्या पॉलीक्लिनिकने १९ आणि २० एप्रिल रोजी महिलांसाठी २ दिवसांचे कर्करोग तपासणी शिबिर आयोजित केले होते. या शिबिराला नागरिकांचा प्रतिसाद मिळाला. माजी कॉर्पोरेटर किरण मढवी आणि युवा नेत्या तेजश्री मढवी यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. या वेळी कानीफ बांगर देखील उपस्थित होते. महिलांमध्ये गर्भाशयाच्या मुखाचा आणि स्तनाच्या कर्करोगाबाबत जनजागृती करण्यासाठी डॉ. प्रिती पांडे यांनी घेतलेला हा उपक्रम स्तुत्य असल्याची प्रतिक्रिया नागरिकांनी दिली.

### शनी महाराज मंदिर वर्धापन दिन



**उरण :** तालुक्यातील नवघर गावाजवळील ठाणेश्वर मंदिर जवळ असलेल्या श्री शनी महाराज मंदिर येथे प्रथम वर्धापन दिन सोहळा शनिवारी (दि. २६) मोठ्या उत्साहात झाला. उरण, पनवेल उलवा नोड आदी परिसरातील सुमारे ७००ते ८०० भक्तांनी दर्शनाचा लाभ घेतला तर ५०० भक्तांनी महाप्रसदाचा लाभ घेतला, असे शेखर तांडेल व प्रियांका शेखर तांडेल यांनी सांगितले. देवांश शेखर तांडेल यांच्या हस्ते आरती करण्यात आली. या वेळी शेखर तांडेल, प्रियांका तांडेल, गणेश तांडेल, शशी बंडा, रवी वाजेकर, राजेश पाटील, रूपेश भोईर आदी उपस्थित होते.

### अंजली आपटे सेवानिवृत्त

**पनवेल :** अंजली आपटे (सिस्टर), प्राथमिक आरोग्य केंद्र वावंजे ह्या ३९ वर्ष प्रदीर्घ सेवा करून शासकीय सेवेतून सेवानिवृत्त होत असल्याने त्यांना प्राथमिक आरोग्य केंद्र वावंजे यांच्यातर्फे निरोप समारंभ देण्यात आला. या कार्यक्रमासाठी पनवेल तालुका आरोग्य अधिकारी डॉ.अपर्णा खेडेकर–पवार तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र वावंजे येथील वैद्यकीय अधिकारी, आरोग्य सेवक–सेविका, शिपाई, स्त्री परिचर, वाहन चालक, सफाई कर्मचारी, डेटा एन्ट्री ऑपरेटर, गटप्रवर्तक, आशा सेविका, अंगणवाडी सेविका प्राथमिक आरोग्य केंद्र गव्हाण, आपटा, नेरे, अजिवली येथील आजी–माजी कर्मचारी तसेच अंजली आपटे यांचे कुटुंबीय, नातेवाईक व मित्रमंडळी उपस्थित होते.





**रसायनी : रसायनी पोलीस ठाण्याला आयसो ९००१– २०१५ मानांकन प्राप्त झाल्याबद्दल पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय बांगर यांचे अनिल भोळे, बी एस कुलकर्णी, आनंद पवार, बाळासाहेब सावर्डे यांनी अभिनंदन केले. या वेळी पीएसआय माळी, एपीआय प्रमोद जाधव, पीएसआय प्रमोद हंबीर, पीएसआय अनुसया ढोणे आदी स्टाफ उपस्थित होता.**




**कळंबोली : भाजप कळंबोली मंडळतर्फे पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यातील मृतांना श्रद्धांजली वाहण्यात आली. यासोबतच अतिरेकी हल्ल्याचा निषेध करण्यात आला.**

## पनवेल महापालिकेत जागतिक हिवताप दिन उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दरवर्षीप्रमाणे यावर्षीही पनवेल महानगरपालिकेच्यावतीने आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली २५ एप्रिल रोजी जागतिक हिवताप दिन विविध उपक्रमांच्या माध्यमातून साजरा करण्यात आला. जागतिक हिवताप दिनानिमित्ताने महापालिका कार्यक्षेत्रातील सर्व नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र,आपला दवाखाना, आरोग्य वर्धिनी केंद्राच्या परिसरामध्ये वैद्यकिय आरोग्य अधिकारी यांच्या समन्वयाने हिवतापाविषयी जनजागृती करण्यात आली.




मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांच्या सूचनेप्रमाणे ,जागतिक हिवताप दिना निमित्ताने हिवतापाची लक्षणे, कारणे व प्रतिबंधात्मक उपायांबाबत नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करण्याच्यादृष्टीने, प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवण्यासाठी मनपाच्या सर्व नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी, आशा सेविकांनी त्या त्या परिसरात रॅली काढून हिवतापाविषयी माहिती देणाऱ्या पत्रकांचे वाटप नागरिकांना केले. याप्रमाणे विविध शाळांमध्येही हिवतापविषयी जनजागृती करण्यात आली.

**अशी घ्या काळजी**

घराभोवती पाणी साचू देऊ नका. डबकी बुजवा, वाहते पाणी ठेवा. खिडक्यांना डास प्रतिबंधक जाळ्या बसवा. पूर्ण बाह्यांचे कपडे परिधान करा. डासांपासून बचाव करणारी क्रीम लावावी. मच्छरदाणीचा वापर करावा. कोणालाही ताप अंगावर घेऊ नका. खराब टायर, फेकून दिलेली शहाळी यांच्यात पाणी साठणार नाही याची काळजी घ्या. डासांपासून संरक्षण देणाऱ्या कॉईल्सचा वापर करा. डॉक्टरांच्या सल्ल्याने हिवतापाचे औषध घ्यावे.

# पहलगाम हल्ल्याचा नागोठण्यात निषेध

## पाकिस्तान मुर्दाबाद घोषणांनी परिसर दणाणला

**नागोठणे : बातमीदार**

काश्मीरमध्ये गेलेल्या पर्यटकांवर दहशतवाद्यांनी भ्याड हल्ला करून २६ निष्पाप बळी घेतले. या घटनेचा निषेध करण्यासाठी नागोठणे शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील शिवपुतळ्याजवळ लोक एकवटले. या वेळी उपस्थितांनी दहशतवादी हल्ल्याचा तीव्र शब्दात निषेध व्यक्त करून भारत माता की जय, पाकिस्तान मुर्दाबाद अशा घोषणा देऊन परिसर दणाणून सोडला.



या वेळी पहलगाम हल्ल्यातील मृतांना श्रद्धांजली वाहण्यात आली. तद्नंतर या भ्याड हल्ला करणाऱ्या दहशतवाद्यांना चोख प्रत्युत्तर देण्याची मागणी करण्यात आली.

या निषेध मोर्चात भाजप नेते किशोर म्हात्रे, राष्ट्रवादीचे नेते व नागोठणे माजी सरपंच विलास चौलकर, विद्यमान उपसरपंच अकलाख पानसरे, व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष प्रकाश जैन, उपाध्यक्ष अनिल काळे, दिनेश परमार, कोंडगाव माजी सरपंच कृष्णा धामणे, डॉ. अन्वर हाफिज, माजी उपसरपंच सुनील लाड, दिनेश घाग, भाजप युवा नेते शेखर गोळे, धनराज उमाळे, अंकुश सुटे, भाजप महिला मोर्चा रोहा तालुका अध्यक्ष अपर्णा सुटे, अतुल काळे, मंदार परांजपे, विवेक रावकर, सुरेश जैन, चेतन कामथे, संतोष चितळकर, रोहिदास हातनोलकर, जनार्दन सकपाळ, महेश जाधव, रोशन जांबेकर, गणेश घाग, दत्ता मढवी, तिरत पोलसानी, बाळा धसाडे, सुदर्शन कोटकर, दिलीप अवाद, जानु कोकरे, हुसेन पठाण, मुजफ्फर कडवेकर, नारायण तेलंगे आदींसह अनेक नागरिक सहभागी झाले होते. दरम्यान, नागोठणे पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सचिन कुलकर्णी यांनी स्वतः उपस्थित राहून चोख पोलीस बंदोबस्त तैनात ठेवला होता.

# खिडकी उघडण्याच्या वादातून प्रवाशाला मारहाण करून लुटले

**पेण : प्रतिनिधी**

लक्झरी बसमध्ये खिडकी उघडण्याच्या वादातून महिला प्रवाशाने साथीदारांच्या मदतीने शेजारील प्रवाशाला धमकावत लुटले. ही घटना पेण तालुक्यातील तरणखोप गावच्या हद्दीतील मिलन हॉटेलजवळ घडली. या प्रकरणी सात जणांना पेण पोलिसांनी अटक केली आहे.



यावाबत माहिती अशी की, फिर्यादी सतिश वासुदेव सावंत (वय ६२, रा. लालबाग, मुंबई, मूळ रा. वरेरी, जि. सिंधुदूर्ग) हे मुंबईहून आपल्या गावी लक्झरी बसने (एमएच ०३ सीव्ही ४००६) जात होते. याच बसमधून महिला आरोपी समृद्धी सुभाष धुरी प्रवास करीत असताना तिने खिडकी उघडण्यावरून झालेल्या वादाचा राग मनात धरून अक्षय सुभाष धुरी (वय २७, रा. तळवडे, सिंधुदुर्ग) याला

### सात जणांना अटक

फोनद्वारे माहिती दिली. त्याने साथीदार गौरव धुरी (वय २८, मूळ रा. देवगड, सध्या रा. गोवंडी, मुंबई), अजय उर्फ संजय लोखंडे (मूळ रा. तोंडापूर, जामनेर), दर्शन संतोष धुरी, संतोष शांताराम धुरी, दीपक अनिल मोरे यांना सफेद रंगाची मारूती सुझुकी कंपनीची इको गाडी (एमएच ०६ बीई १४२१) मधून येऊन पेणमधील तरणखोप गावच्या हद्दीत जेवणासाठी थांबलेले फिर्यादी सतीश सावंत यांना मारहाण केली. या वेळी आरोपींनी सावंत यांच्या गळ्यातील एक लाख २० हजार रुपयांची सोन्याची चेन व १४ हजार रोख रक्कम चोरून नेली होती.

पोलीस निरीक्षक संदीप बागुल यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे अन्वेषण अधिकारी पोलीस उपनिरीक्षक समद बेग व पथकाने आरोपींना अटक केली. अधिक तपास सुरू आहे.

# खासदार सुनील तटकरेंकडून आंबेवाडी ते निवी कालव्याची पाहणी

## शेवटपर्यंत पाणी पोहचवण्याच्या प्रशासनाला सूचना

**धाटाव : प्रतिनिधी**

कोलाड पाटबंधारे विभागांतर्गत येणाऱ्या आंबेवाडी ते निवी कालव्याची खासदार सुनील तटकरे यांनी शुक्रवारी (दि. २५) सायंकाळी पाहणी केली. सबंध विभागासाठी कालव्याचे पाणी गरजेचे आहे. विहिरी, बोअरवेल जिवंत होतील, पाण्याचा स्रोत कायम राहील. परिसर पूर्वीसारखा सुजलाम् सुफलाम् होईल ही महत्त्वाची बाब बळीराजा फाऊंडेशनने पुन्हा एकदा खासदार तटकरेंच्या निर्दशनास आणून दिली. दुरुस्ती कामांची पाहणी करावी, प्रशासनाला सूचना करण्यात याव्यात, अशा मागणीची गांभीर्याने दखल घेत खासदार तटकरेंनी दुरुस्ती कामे पाहणी दौरा केला. त्यांनी अशोकनगर ते निवी भुवनेश्वरपर्यंतच्या कालव्याच्या विविध कामांची पाहणी केली व कामाबद्दल पाटबंधारे प्रशासनाला सूचना केल्या. दरम्यान, सायंकाळी तिसे मुख्य मार्गातून कालव्याला पाणी सोडण्यात आले.

आठवडाभर सायपन, एस्कॅप, साफसफाईचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. कामांची माहिती घेत निवी हद्द शेवटपर्यंत पाणी पोहचवण्याच्या सूचनाही खासदार तटकरेंनी कार्य अभियंता मिलिंद पवार यांना दिल्या. गावोगावच्या ग्रामस्थांच्या कालव्यासंबंधी अडचणी दूर करण्याच्या दृष्टीने दुरूस्ती कामेही मार्गी लावा अशा खासदार तटकरेंच्या विविध सूचनांनी कालव्याच्या दुरुस्ती कामांना अधिक वेग आला आहे. कालव्याच्या पाण्यासाठी बळीराजा फाऊंडेशनने निकराचा लढा दिला. त्यामुळे कालव्याला नव्याने संजीवनी मिळाली.





आंबेवाडी ते निवी कालवा अनेक वर्षे मृतप्राय झाल्याने परिसराला मार्च ते पावसाळा प्रारंभ वाळवंटाचे रुपडे येत. दुसरीकडे पोल्ट्री, विविध शेती व्यवसाय धोक्यात आला, दुबार भातशेती इतिहासात जमा झाली. झाडांनी माना टाकल्या. विहिरी, बोअरवेल पाण्याचे स्त्रोत निकामी ठरल्याने पाण्याची भीषणता कायम आहे. याच गांभीर्यातून कालव्याच्या पाण्यासाठी बळीराजा फाऊंडेशनने लढा उभा केला. आंदोलने, उपोषण केले. आक्रमकतेपुढे प्रशासनाने नमते घेत कालव्याची दुरुस्ती सुरू केली.

कामांना वेग यावा, अधिक दुरुस्ती निधी उपलब्ध व्हावा, त्यासाठी कालव्याची पाहणी करावी अशी मागणी बळीराजा फाऊंडेशनने खासदार तटकरे यांना भेटीत केली. मागणी तातडीने मान्य करीत शुक्रवारी कालव्याचा पाणी दौरा झाला. या वेळी बळीराजा फाऊंडेशन शेतकऱ्यांसमवेत कार्यकारी अभियंता मिलिंद पवार, सरचिटणीस विजय मोरे, तालुकाध्यक्ष विनोद पाशिलकर, कार्याध्यक्ष समीर शेडगे, सरचिटणीस सुरेश मगर, बळीराजा फाऊंडेशनचे अध्यक्ष विठ्ठल मोरे, संस्थापक राजेंद्र जाधव, उपअध्यक्ष तुकाराम भगत, सचिव दीपक भगत पदाधिकारी, अधिकारी परिसरातील ग्रामस्थ, शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अशोकनगर, खैरवाडी येथील कालव्यातील ड्रेनेजचे पाणी, सायपन, एस्कॅप कामांची पाहणी करत कामे तातडीने मार्गी लावण्याच्या सूचना खासदार तटकरेंनी कार्यकारी अभियंता मिलिंद पवार, विभागीय उपविभागीय अनिल बुधाराम यांना केल्या. बोरघर येथील ओहळ पाणी, निवी वरसे हद्दीतील पावसाळी पाण्याचा निचरा लायनिंग कामेही हाती घ्या, असे निर्देशही तटकरेंनी दिले.

पाणी पूर्वपार सुरळीत राहावे, परिसर सुजलाम् सुफलाम् व्हावा, म्हणूनच कालव्याची गरज आहे. यासाठीच आम्ही बळीराजा फाऊंडेशनच्या माध्यमातून लोक लढा दिला. त्याला अपेक्षित यश येत आहे. आता खासदार तटकरेंनी कामांची पाहणी करत प्रशासनाला सूचना दिल्याने कामाचा वेग वाढला, अशी प्रतिक्रिया बळीराजा फाऊंडेशनचे संस्थापक राजेंद्र जाधव यांनी दिली, दरम्यान, मी पाणीदार, मी हक्कदार असे लिहिलेली गांधी टोपी बळीराजा फाऊंडेशनच्या शेतकऱ्यांनी घातल्याने अख्ख्या परिसर कृषीमय झाल्याचे दृश्य पहायला मिळाले, तर कालव्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागेल या घटनेने सबंध विभाग सुखावल्याचे चित्र दिसून आले.

# राठी स्कूलमध्ये करिअर मार्गदर्शन मेळावा

**रोहे : प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांनी उज्ज्वल भविष्यासाठी योग्य करिअर निवडणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी जे.एम. राठी इंग्लिश स्कूल आणि ज्युनिअर कॉलेज रोठ येथे २८ एप्रिल रोजी विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन मेळावा आयोजित करण्यात आला आहे. हा एक विशेष करिअर मार्गदर्शन मेळावा असून यामध्ये तज्ज्ञ मार्गदर्शक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत.

या करियर मार्गदर्शन मिळाव्यात विविध क्षेत्रातील तज्ज्ञ मार्गदर्शकांची उपस्थिती आणि प्रतिनिधींशी संवाद, विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीनुसार योग्य करिअर निवडण्यास मदत आणि मार्गदर्शन, विद्यापीठांमध्ये उपलब्ध अभ्यासक्रम शैक्षणिक अहर्ता, अभ्यासक्रमाचे शैक्षणिक शुल्क, विद्यापीठाकडून मिळणारी शिष्यवृत्ती या संदर्भात माहिती देण्यात येणार आहे. हा मेळावा २८ रोजी दुपारी ३.३० ते ६ वाजता जे.एम. राठी इंग्लिश स्कूल आणि ज्युनिअर कॉलेज रोठ येथे होणार आहे.

या मेळाव्यात इयत्ता आठवी ते बारावीपर्यंतचे विद्यार्थी व पालक सहभागी होऊ शकतात. त्यासाठी प्रवेश फ्री १०० रुपये फक्त विद्यार्थ्यांसाठी ठेवण्यात आली आहे. अधिक माहितीसाठी शाळेच्या कार्यालयामध्ये ९२८४६७८३५२, ९१७५२८१५०२ संपर्क साधण्याचे आयोजकांकडून आवाहन करण्यात आले आहे.

# मूकबधिर विद्यालयात प्रवेश

**रायगड : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हा व कोकण विभागातील मूकबधिर मुला-मुलींच्या शिक्षणाच्या सोयीसाठी शासनाने अलिबाग विद्यानगर येथे शासकीय मुकबधिर विद्यालय सुरू केले आहे. येथे विविध सोयीसुविधा पुरविण्यात येतात.

या ठिकाणी ६ ते १६ वयोगटातील मूकबधिर मुला-मुलींसाठी इयत्ता पहिली ते चौथी पर्यंतचे मोफत शिक्षण देण्यात येते. प्रवेशित मुला-मुलींसाठी स्वतंत्र्य निवास व्यवस्था आहे. भोजन, वह्या, पुस्तके व शैक्षणिक साधने आदी सुविधा विनामूल्य पुरविण्यात येतात.

इच्छुक पालकांनी आपल्या पाल्यांच्या प्रवेशासाठी अधिक्षक, शासकीय मूकबधिर विद्यालय, अलिबाग जि. रायगड यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा समाजकल्याण अधिकारी, रायगड जिल्हा परिषद, यांनी केले आहे. संपर्कासाठीचा भ्रमणध्वनी क्रमांक ९५९४३१३१७९ श्री. शिंदे (प्र. अधीक्षक), ७०३०३९००२० श्री. वेखंडे, ९९७०५२५३४५ श्री. बोरकर अधीक्षक शासकीय मूकबधिर विद्यालय असे आहेत.

# साळावच्या जिंदल विद्यालयात इंग्रजी भाषा दिन साजरा

**मुरूड : प्रतिनिधी**

साळाव येथील जिंदल विद्यामंदिरात इंग्रजी भाषा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. नर्सरी ते इयत्ता बारावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी विविध उपक्रमांमधून सक्रिय सहभाग नोंदवत इंग्रजी भाषेवरील आपले प्रेम व्यक्त केले.



या दिवशीचा संबंध थेट महान नाटककार विल्यम शेक्सपिअर यांच्या जन्म व मृत्यू दिनाशी असल्याने कार्यक्रमाच्या सुरुवातीलाच त्यांच्या साहित्यिक योगदानाचा गौरव करणारे भाषण झाले. संपूर्ण शाळा परिसर साजशृंगाराने सजला होता आणि विविध उपक्रमांमधून विद्यार्थ्यांच्या भाषिक कौशल्यांची उत्तम झलक पहायला मिळाली.

कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरले 'रस्किन बाँड' यांच्यावर आधारित प्रश्नमंजुषा स्पर्धा, जिच्यात विद्यार्थ्यांनी या प्रसिद्ध लेखकाविषयीचे आपले ज्ञान दाखवले. त्यानंतर सादर झालेला 'ग्रॅमर डान्स' म्हणजेच व्याकरण व नृत्य यांचा सुंदर संगम उपस्थितांना मंत्रमुग्ध करणारा ठरला.

नर्सरी, एलकेजी व यूकेजीमधील चिमुकल्यांनी सादर केलेल्या नृत्यांनी उपस्थितांचे मन जिंकले, तर मोठ्या वर्गातील विद्यार्थ्यांनी प्रसिद्ध इंग्रजी साहित्यकृतींवर आधारित गीत, नृत्य व अभिनय सादर करून रसिकांची वाहवा मिळवली.

प्राचार्य मुकेश ठाकूर यांनी सर्व विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे कौतुक करत अशा उपक्रमांमधून इंग्रजी भाषेचे सौंदर्य आणि साहित्याची गोडी अधिक विद्यार्थ्यांपर्यंत पोहचेल, असा विश्वास व्यक्त केला.

उपप्राचार्य मंगेश बमनोटे यांनीही विद्यार्थ्यांचे उत्साहाने केलेल्या सादरीकरणाचे कौतुक करीत इंग्रजी साहित्याशी विद्यार्थ्यांचे नाते अधिक दृढ व्हावे, असे मार्गदर्शन केले. सर्वांनी आनंद व्यक्त केला.

# रेवदंडा पोलीस ठाण्याला स्मार्ट आयएसओ मानांकन प्रमाणपत्र



**रेवदंडा : प्रतिनिधी**

विविध निकषाच्या मुल्यांकनानूसार ए श्रेणीत अधिक गुण मिळवून रेवदंडा पोलीस ठाण्यास स्मार्ट आयएसओ मानांकन प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे.

अलिबाग येथे जिल्हा पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे व अपर पोलीस अधीक्षक अभिजित शिवतरे यांच्या हस्ते रेवदंडा पोलीस ठाणे इन्चार्ज पोलीस निरीक्षक श्रीकांत किरविले यांनी आयएसओ मानांकन प्रमाणपत्र स्वीकारले.

प्रशिक्षित कर्मचारी वर्ग, आधुनिक तंत्रज्ञान आदी गोष्टींची पहाणी करून व मूल्यांकनात कामकाजाची दैनंदिन पाहणी, स्वच्छता, दर्शनी भागातील सुशोभीकरण, विविध सुविधा, आलेल्या व्यक्तीचे समुपदेशन, महिलांच्या सुरक्षिततेसाठी राबवले जाणारे विविध उपक्रम, अपघात टाळण्यासाठी वाहतुकीच्या नियमांचे पालन आदी विविध सोयी-सुविधांचे मूल्यांकन करून रेवदंडा पोलीस ठाण्याची स्मार्ट पोलीस ठाणे म्हणून निवड करण्यात आली.

# रातवड येथे जागतिक हिवताप दिन साजरा

**माणगाव : बातमीदार**

प्राथमिक आरोग्य केंद्र इंदापूर अंतर्गत आयुष्मान आरोग्य मंदिर रातवड येथे आरोग्य सेवक सुधीर खैरे रातवड तसेच आरोग्य सेविका सी.एन. मोरे यांनी जागतिक हिवताप दिन साजरा केला. या वेळी हिवताप आजारावर मार्गदर्शन करण्यात आले.

जि.प. शाळा रातवड आदिवासीवाडी आणि जि.प. शाळा रातवड येथे भेट देऊन तेथील शालेय विद्यार्थी, शिक्षक वृंद तसेच अंगणवाडी सेविका व ग्रामस्थ यांच्या समवेत हिवताप प्रतिज्ञा घेण्यात आली.



हिवताप आजारावर आरोग्य शिक्षण दिले गेले.

कणकण आली तापाची करा तपासणी रक्ताची, स्वच्छ गाव सुंदर गाव, कोरडा दिवस पाळा हिवताप टाळा, मच्छरदाणीचा वापर करा, अशा प्रकारे आवाहन करण्यात आले आहे.

# जिल्ह्यात कंपोस्ट खड्डा भरू, आपले गाव स्वच्छ ठेवू अभियान

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात १ मे ते ३० सप्टेंबर या कालावधीत कंपोस्ट खड्डा भरू, आपले गाव स्वच्छ ठेवू हे अभियान राबविण्यात येणार आहे. जिल्ह्यातील प्रत्येक गावात लोकसहभागातून या अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे आवाहन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले व पाणी व स्वच्छता विभाग उपमुख्य कार्यकारी अधिकारी शुभांगी नाखले यांनी केले आहे.

याबाबतच्या मार्गदर्शक सूचना पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी यांना देण्यात आल्या आहेत.




कंपोस्ट खड्डा भरू, आपले गाव स्वच्छ ठेवू अभियानाचा शुभारंभ १ मे रोजी करण्यात येणार आहे. अभियानांतर्गत गटविकास अधिकारी हे पंचायत समिती स्तरावर ग्रामपंचायत अधिकारी यांची कार्यशाळा व बैठक घेतील. त्यानंतर ग्रामपंचायत अधिकारी हे ग्रामस्थांना माहिती देतील तसेच गावात दवंडी दिली जाईल. शाळा, अंगणवाडी, ग्रामपंचायत कार्यालय येथे सूचना फलकावर माहिती प्रसारित करण्यात येईल. १ ते १० मे या कालावधीत गावातून संकलित केलेला ओला कचरा कंपोस्ट खड्ड्यात भरण्यात येईल. त्यापासून खतनिर्मितीनंतर १५ सप्टेंबरपर्यंत कंपोस्ट खड्ड्यात तयार झालेले खत उपसण्याची प्रक्रिया करण्यात येणार आहे.

कंपोस्ट खड्ड्यांची पडताळणी करण्यासाठी जिल्हा स्तर तसेच तालुका स्तरावर अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. अभियान यशस्वी करण्यासाठी ग्रामस्थ, महिला बचत गट, युवक मंडळे यांचा सहभाग घ्यावा, असे निर्देश देण्यात आले आहेत.

# हैदराबादचा चेन्नईवर ऐतिहासिक विजय

**चेन्नई : वृत्तसंस्था**

सनरायझर्स हैदराबादने शुक्रवारी चेन्नई सुपर किंग्सवर पाच विकेट्सने विजय मिळवत आयपीएलच्या १८ वर्षांच्या इतिहासात पहिल्यांदाच सीएसकेचा चेपॉकवर पराभव केला आहे. फॉर्मात नसलेल्या नितीश रेड्डी आणि कामिंदू मेंडिस अखेरच्या षटकांमध्ये संघाला विजयापर्यंत घेऊन गेले. या विजयासह हैदराबादचा संघ गुणतालिकेत आठव्या स्थानी पोहोचला आहे.



गुणतालिकेत अखेरच्या क्रमांकावर असलेल्या चेन्नई आणि हैदराबादमध्ये हा सामना खेळवला गेला. दोन्ही संघांसाठी या सामन्यातील विजय होता आणि हैदराबादने विजय आपल्या दिशेने वळवला. या हंगामात सनरायझर्सचा नऊ सामन्यांतील हा तिसरा विजय आहे आणि संघ पॉइंट्स टेबलमध्ये नवव्या स्थानावरून आठव्या स्थानावर पोहोचला आहे. चेन्नईचा हा इतक्याच सामन्यांमधील सातवा पराभव आहे आणि संघ दहाव्या क्रमांकावर कायम आहे.

सनरायझर्सने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आणि मोहम्मद शमीने पहिल्याच चेंडूवर विकेट घेत संघाला चांगली सुरुवात करून दिली. यानंतर युवा फलंदाज आयुष म्हात्रेने जोरदार फटकेबाजी केली, पण तोही पॉवरप्लेमध्ये बाद झाला आणि चेन्नईने फक्त ४७ धावांत तीन विकेट गमावल्या.

यानंतर चेन्नईसाठी पदार्पण करणाऱ्या युवा फलंदाज डेवाल्ड ब्रेविसने संथ सुरुवातीनंतर आक्रमक फलंदाजी करीत षटकारांचा पाऊस पाडला, पण कामिंदू मेंडिसच्या थक्क करणाऱ्या झेलमुळे तो पॅव्हेलियनमध्ये परतला. यानंतर हर्षल पटेल आणि पॅट कमिन्स यांनी संघाला लवकर धावा करू दिल्या नाहीत आणि संघ १९.५ षटकांत १५४ धावांवर ऑलआउट झाला.

चेन्नईने दिलेल्या १५५ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना हैदराबादची सुरुवातही फारशी चांगली झाली नाही. अभिषेक शर्मा खाते न उघडता पहिल्याच षटकात झेलबाद झाला. यानंतर ट्रॅव्हिस हेडही पॉवरप्लेच्या अखेरच्या षटकात झेलबाद झाला. इशान किशनने मधल्या षटकांमध्ये वादळी फलंदाजी करीत संघासाठी महत्त्वपूर्ण धावा केल्या आणि ४४ धावांवर झेलबाद झाला. यानंतर अनिकेत वर्मा १९ धावा करत १४व्या षटकात बाद झाला. मग कामिंदू मेंडिस आणि नितीश रेड्डीने संघाला विजयापर्यंत नेले. मेंडिस २२ चेंडूत तीन चौकारांसह ३२ धावा करीत नाबाद राहिला, तर नितीशने दोन चौकारांसह १९ धावा करीत चांगली साथ दिली. यासह हैदराबादने १८.४ षटकांत १५५ धावा करून सामन्यात शानदार विजय मिळवला.

# भुवनेश्वर येथे क्रीडा प्रबोधनी होणार -मंत्री आदिती तटकरे

**रोहा : प्रतिनिधी**

दोस्ती कट्टर ग्रुपचे मी मनःपूर्वक अभिनंदन करते. गेल्या वर्षी या स्पर्धेसाठी आले होते. पुन्हा येण्याचा योग आला. आयोजकांनी चांगले आयोजन केले आहे. रोह्यातील खेळाडूंसाठी खासदार सुनील तटकरे यांच्या प्रयत्नातून डिफेन्स अकॅडमी, क्रीडा प्रबोधनी या ठिकाणी करण्यात येणार असल्याचे मंत्री अदिती तटकरे यांनी सांगितले.

रोहा भुवनेश्वर येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज स्टेडियमवर कट्टर दोस्ती ग्रुपच्या वतीने रोहा चॅम्पियन ट्रॉफी प्रकाशझोतातील क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेला मंत्री तटकरे यांनी सदिच्छा भेट दिली. त्या वेळी त्या बोलत होत्या.




माजी आमदार अनिकेत तटकरे यांनी, या मैदानात क्रीडापटूंसाठी चांगल्या सुविधा देण्यासाठी काम करण्यात येत असून येथे बॅडमिंटन, कबड्डी यांचे अन्य मैदान करण्यात येणार आहेत, ज्याचा फायदा क्रीडापटूंना होणार असल्याचे सांगितले.

मंचावर राष्ट्रवादी तालुका कार्याध्यक्ष समीर शेडगे, शहराध्यक्ष अमित उकडे, युवक अध्यक्ष जयवंत मुंडे, महेश सरदार, सतीश भगत, अमित मोहिते, शहर उपाध्यक्ष चंद्रकांत पार्टे, रवी चाळके, मयूर पायगुडे, निलेश शिर्के, अभिजित पाशिलकर, नितीन माने, तुषार शिंदे, विशाल शेलार, नितेश जाधव, अंकित मोहिते, राकेश पडवळ, भाऊ शेलार, भुवड आदी उपस्थित होते.

स्पर्धेच्या दुसऱ्या दिवशी आठ संघातून श्री जोगीरदेव पोस्टाचीवाडी व खामजाई खांब संघांनी चमक दाखवत अंतिम फेरीत प्रवेश केला आहे.

## मेंडिसने टिपला अप्रतिम झेल



**चेन्नई : वृत्तसंस्था**

चेन्नई सुपर किंग्स वि. सनरायझर्स हैदराबाद सामन्यात एक जबरदस्त झेल पहायला मिळाला. या सामन्यात चेन्नईकडून डेवाल्ड ब्रेविस उत्कृष्ट फलंदाजी करीत होता. त्याचा हैदराबादच्या कामिंदू मेंडिस याने सीमारेषेजवळ थक्क करणारा झेल टिपला, ज्याचा व्हिडीओ व्हायरल होत आहे.

या सामन्यात चेन्नईने प्रथम फलंदाजी केली, पण त्यांचे फलंदाज पुन्हा एकदा दमदार कामगिरी करण्यात अपयशी ठरले. १७ वर्षीय फलंदाज आयुष म्हात्रेने निश्चितच एक छोटी पण वादळी खेळी केली आणि संघाला मोठ्या धावसंख्येपर्यंत नेण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. त्याच्याशिवाय एका फलंदाजाने आपली प्रतिभा दाखवली आणि तो होता डेवाल्ड ब्रेव्हिस, ज्याने सीएसकेसाठी या सामन्यात पदार्पण केले.

ब्रेव्हिसने फक्त २४ चेंडूत ४२ धावा केल्या होत्या आणि तो संघाला मोठ्या धावसंख्येकडे घेऊन जाण्याचा प्रयत्न करीत होता, पण २५व्या चेंडूवर त्याने अद्‌भूत क्षेत्ररक्षणामुळे आपली विकेट गमावली. १३व्या षटकात ब्रेविसने हर्षल पटेलचा चेंडू पूर्ण ताकदीने खेळला आणि चेंडू बुलेटच्या वेगाने लाँग ऑफच्या दिशेने सीमा ओलांडताना दिसला, पण तिथेच तैनात असलेल्या मेंडिसने डावीकडे धाव घेतली व एक लांब डाईव्ह घेत दोन्ही हातांनी चेंडू हवेत पकडला.

ब्रेविसने फटका मारलेला चेंडू ज्या वेगाने आला तो लक्षात घेता मेंडिसने झेल घेऊन सर्वांना आश्चर्यचकित केले. या एका झेलमुळे ब्रेविसला माघारी धाडले आणि चेन्नईच्या धावांच्या गतीला ब्रेक लागला. अर्थातच, हा या हंगामातील सर्वोत्तम झेल ठरला आहे.

## मोहम्मद शमीने घडवला इतिहास

**चेन्नई : वृत्तसंस्था**

**पहिल्याच चेंडूवर विकेट मिळविण्याची चारवेळा किमया**

चेन्नई सुपर किंग्जच्या घरच्या मैदानावर म्हणजेच चेपॉकवर झालेल्या सामन्यात सनरायझर्स हैदराबादचा गोलंदाज मोहम्मद शमी याने अनोखी कामगिरी केली आहे. शमीने सामन्यातील पहिल्याच चेंडूवर विकेट घेत इतिहास घडवला.


मोहम्मद शमीने या सामन्याची सुरुवात अतिशय धमाकेदार पद्धतीने केली. त्याने सामन्याच्या पहिल्याच चेंडूवर चेन्नई सुपर किंग्जचा युवा सलामीवीर शेख रशीदची विकेट घेतली. आयपीएलमध्ये चौथ्यांदा शमीने सामन्याच्या पहिल्याच चेंडूवर विकेट घेतली. चार वेळा हा पराक्रम करणारा तो एकमेव गोलंदाज आहे. याशिवाय, तो आयपीएलमध्ये चौथ्यांदा डावाच्या पहिल्या चेंडूवर विकेट घेण्याचा पराक्रम करणारा पहिला गोलंदाज बनला.

# एमसीएच्या स्पर्धेचे सामने रायगडात

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन (एमसीए)च्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या अंतरजिल्हा निमंत्रित १६ वर्षांखालील मुलांच्या दोन दिवसीय क्रिकेट स्पर्धेचे सामने प्रथमच रायगड जिल्ह्यात खेळविण्यात येणार आहेत. या स्पर्धेतील १५ सामने जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या यजमान पदाखाली जिल्ह्यातील विविध मैदानावर होणार आहेत.

कोल्हापूर, सातारा, रायगड, वायएमसीए क्रिकेट क्लब, युनायटेड क्रिकेट क्लब, साऊथ झोन अशा सहा संघांमध्ये साखळी फेरीतील सामने खेळवले जाणार आहेत. रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशन (आरडीसीए)



चा संघ पहिल्यांदाच आपल्या घरच्या मैदानांवर खेळणार असल्याने खेळाडूंमध्ये उत्साहाचे वातावरण असल्याची माहिती आरडीसीएचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील यांनी दिली.

रायगड जिल्ह्यात प्रथमच एमसीएचे सामने होत असल्याचा आपल्याला आनंद आहे. त्यासाठी आपण एमसीएचे अध्यक्ष आमदार रोहित पवार, सचिव ॲड. कमलेश पिसाळ, सदस्य सुशील शेवाळे, स्पर्धा कमिटीचे अध्यक्ष राजू काणे, सीईओ अजिंक्य जोशी व सर्व पदाधिकारी, सदस्यांचे आभार मानत असल्याचे आरडीसीएचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील यांनी सांगितले.

२५ वर्षांपूर्वी रायगड जिल्ह्यात आंतरजिल्हा क्रिकेट स्पर्धेचे आयोजन होत असे. त्यात कोकण ट्रॉफी, जसदनवाला ट्रॉफी, १९ वर्षांखालील मुलांसाठीची तनपुरे ट्रॉफी अशा स्पर्धेतील सामने रायगड जिल्ह्यात खेळवले जात होते. आता अनेक वर्षांच्या कालावधीनंतर पुन्हा रायगड जिल्ह्यात एमसीएच्या स्पर्धेतील सामन्यांचे आयोजन करण्यात येत आहे.

### इथे होणार लढती

रिलायन्स क्रिकेट मैदान नागोठणे, छत्रपती शिवाजी महाराज क्रीडांगण पेण, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सिक्युरिटी मार्केट्स रसायनी पाताळगंगा, पनवेल महानगरपालिका मैदान आदई पनवेल, छत्रपती शिवाजी महाराज क्रीडांगण उलवे नोड, माजगाव क्रिकेट क्लब मैदान रोडपाली या मैदानांवर स्पर्धेतील सामन्यांचे आयोजन करण्यात येणार आहे. सामन्यांच्या यशस्वी आयोजनासाठी आरडीसीएचे पदाधिकारी व सदस्य परिश्रम घेत आहेत.

# आयपीएलमध्ये प्लेऑफसह ऑरेंज आणि पर्पल कॅपची रंगतदार शर्यत

**मुंबई : प्रतिनिधी**

यंदाच्या आयपीएलमध्ये गुणतक्त्यात दरवर्षीपेक्षा थोडे वेगळेच चित्र दिसत आहे. एकीकडे बलाढ्य चेन्नईचा संघ तळाला आहे, तर गतविजेता कोलकाता नाईटरायडर्सचा संघही झुंजत आहे. दिल्ली कॅपिटल्स, गुजरात टायटन्स, रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू हे संघ दबदबा राखून आहेत.



आयपीएलमधील संघांत एकीकडे प्लेऑफसाठीची शर्यत रंगली असतानाच दुसरीकडे सर्वाधिक धावा करणाऱ्या फलंदाजाला मिळणाऱ्या ऑरेंज कॅप आणि सर्वाधिक बळी टिपणाऱ्या गोलंदाजांला मिळणाऱ्या पर्पल कॅपसाठीही खेळाडूंमध्ये चुरस दिसून येत आहे.

आयपीएलमध्ये शुक्रवारी चेन्नई सुपरकिंग्स आणि सनरायझर्स हैदराबाद यांच्यात झालेल्या सामन्यानंतर पर्पक कॅपच्या क्रमावारीत काही बदल झाले. यात हैदराबादचा हर्षल पटेल आणि चेन्नईचा नूर अहमद यांचे पहिल्या पाच गोलंदाजांमध्ये पुनरागमन झालं. पर्पल कॅपच्या शर्यतीमध्ये गुजरात टायटन्सचा प्रसिद्ध कृष्णा आठ सामन्यांत १६ बळींसह आघाडीवर आहे. कृष्णाप्रमाणेच जोश हेझलवूडनेही १६ बळी टिपले आहेत, मात्र सरस इकॉनॉमीमुळे कृष्णा आघाडीवर आहे.

चेन्नई सुपरकिंग्सच्या नूर अहमद याने शुक्रवारी दोन बळी टिपले. याबरोबरच यंदाच्या हंगामात त्याने टिपलेल्या बळींची संख्या १३वर पोहचली. त्याने सर्वाधिक बळी घेणाऱ्या गोलंदाजांच्या क्रमवारीत तिसरे स्थान पटकावले आहे, तर याच सामन्यात चार बळी टिपणाऱ्या हर्षल पटेलने १३ बळींसह चौथे स्थान मिळवले आहे. याशिवाय पर्पल कॅपच्या यादीमध्ये इतर १२ गोलंदाजांच्या नावार प्रत्येकी १२ बळी आहेत.

ऑरेंज कॅपसाठीही अटीतटीची लढाई सुरू आहे. यात गुजरात टायटन्सचा साई सुदर्शन ४१७ धावांसह अव्वल स्थानावर आहे. त्याच्यापाठोपाठ विराट कोहली दुसऱ्या क्रमांकावर आहे. विराटने आतापर्यंत ३९२ धावा फटकावल्या आहेत, तर सुरुवातीला या क्रमवारी अव्वल स्थानी असलेला निकोलस पुरन ३७७ धावांसह तिसऱ्या क्रमांकावर आहे. मागच्या तीन डावांत पुरनची बॅट तळपलेली नाही. मुंबईचा सूर्यकुमार यादव ३७३ धावांसह चौथ्या क्रमांकावर, तर गुजरातचा जोस बटलर आणि राजस्थानचा यशस्वी जयस्वाल ३६५ धावांसह संयुक्तरीत्या पाचव्या क्रमांकावर आहे.

संघांच्या गुणतक्त्यामध्ये गुजरात टायटन्स, दिल्ली कॅपिटल्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांचे प्रत्येकी १२ गुण असून धावगतीनुसार गुजरात पहिल्या, दिल्ली दुसऱ्या आणि बंगळुरू तिसऱ्या क्रमांकावर आहे, तर मुंबई इंडियन्स १० गुणांसह चौथ्या क्रमांकावर आहे. याशिवाय पंजाब किंग्स आणि लखनऊ यांचेही प्रत्येकी १० गुण आहेत. मात्र कमी धावगतीमुळे ते अनुक्रमे पाचव्या आणि सहाव्या क्रमांकावर आहेत. कोलकाता नाईटरायडर्स सातव्या, तर सनरायझर्स हैदराबाद आठव्या क्रमांकावर आहे. राजस्थान रॉयल्स नवव्या आणि चेन्नई सुपरकिंग्स दहाव्या क्रमांकावर आहे.

## पाकिस्तानबरोबरचे क्रिकेट संबंध कायमचे तोडा!

### पहलगाम हल्ल्यानंतर सौरव गांगुली आक्रमक

**कोलकाता : वृत्तसंस्था**

पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यात पाकिस्तानचा थेट सहभाग असल्याचे आता स्पष्ट होत आहे. अशा परिस्थितीत संपूर्ण देशात पाकिस्तान विरोधात वातावरण आहे. दरम्यान, भारतीय क्रिकेट संघाचा माजी कर्णधार सौरव गांगुलीने या संपूर्ण प्रकरणावर कडक भूमिका घेत पाकिस्तनाबरोबरचे सर्व क्रिकेट संबंध तोडावे, असे म्हटले आहे.




कोलकातामध्ये जेव्हा सौरव गांगुलीला विचारण्यात आले की, भारताने पाकिस्तानशी क्रिकेट संबंध तोडावेत का? तेव्हा सौरव गांगुली म्हणाला, १०० टक्के तोडावे. पाकिस्तानने केलेल्या कृत्यावर कठोर कारवाई करावी. हा चेष्टेचा विषय नाही, अशा गोष्टी दरवर्षी घडतात. आता दहशतवाद सहन करता येणार नाही.

या दहशवादी हल्ल्यानंतर भारताने कठोर भूमिका घेत पाकिस्तानवर अनेक निर्बंध लादले आहेत. पहलगाम हल्ल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळाच्या सुरक्षा विषयक समितीची बैठक बोलावण्यात आली होती, ज्यामध्ये पाकिस्तानी नागरिकांना माघारी पाठवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

# सीएसकेचा पराभव पाहून श्रुती हसनच्या डोळ्यात अश्रू

**चेन्नई : वृत्तसंस्था**

चेन्नई सुपर किंग्ससाठी अभेद्य किल्ला असणारे चेपॉकचे मैदान यंदा मात्र ढासळले आहे. सीएसकेने यंदा घरच्या मैदानावर विक्रमी तीन सामने गमावले आहेत. सनरायझर्स हैदराबादने तर आयपीएल इतिहासात प्रथमच चेपॉकच्या मैदानावर विजय मिळवला. चेन्नई वि. हैदराबाद हा सामना पाहण्यासाठी अभिनेत्री श्रुती हसनदेखील उपस्थित होते. चेन्नईच्या पराभवानंतर श्रुतीचा रडतानाचा व्हिडीओ व्हायरल होत आहे.



श्रुतीने तिचे काही फोटो सोशल मीडियावर शेअर केले आहेत, ज्यामध्ये ती चेन्नई संघ आणि महेंद्रसिंह धोनीला सपोर्ट करण्यासाठी स्टेडियममध्ये पोहचली होता, मात्र या सामन्यात तिच्या आवडत्या सीएसकेला हैदराबादविरुद्ध दारुण पराभव पत्करावा लागला. चेन्नई संघाला हरताना पाहून श्रुती इतकी भावूक झाली की ती स्टेडियममध्येच रडू लागली.

चेन्नई सुपर किंग्ज आणि सनरायझर्स हैदराबाद यांच्यातील सामन्यातील श्रुती हासनचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. यामध्ये ती खूप भावुक झालेली दिसत आहे आणि तिचे अश्रू पुसताना दिसत आहे. तिच्या आवडत्या संघाला हरताना पाहून श्रुती फारच निराश झाली होती. श्रुतीशिवाय ज्येष्ठ अभिनेते अजित कुमार हेदेखील त्यांच्या कुटुंबासह सामना पाहण्यासाठी स्टेडियममध्ये पोहचले होते. त्यांचा मुलगा चेन्नई सुपर किंग्जच्या जर्सीमध्ये दिसला.

सनरायझर्स हैदराबादने चेन्नई सुपर किंग्जचा आट चेंडू शिल्लक ठेवत पाच विकेट्सने पराभव करून इतिहास घडवला. हैदराबादने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आणि सीएसकेचा डाव फक्त १५४ धावांवर गुंडाळला.

घरच्या मैदानावर चेन्नईचा आणखी एक पराभव झाल्याने संघाच्या चाहत्यांची निराशा झाली आहे. या पराभवामुळे संघाच्या प्लेऑफच्या आशा जवळजवळ संपल्या आहेत.

# भारत-पाकिस्तान क्रिकेट सामन्यांबाबत अनिश्चितता

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यातील संबंध आणखी तणावपूर्ण झाले आहेत. यामुळे आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद (आयसीसी) आणि आशियाई क्रिकेट परिषद (एसीसी) यांच्या आगामी स्पर्धांमध्ये भारत-पाकिस्तान सामन्यांबाबत अनिश्चितता निर्माण झाली आहे.

पुरुष आशिया कप स्पर्धेचे यंदाचे यजमानपद बीसीसीआयकडे आहे. त्यामुळे ही स्पर्धा भारतात आयोजित केली जाणार आहे. 'क्रिकबझ'ने दिलेल्या माहितीनुसार ही स्पर्धा तटस्थ देशात होणार असून सप्टेंबरमध्ये दुबईत किंवा श्रीलंकेत आयोजित केली जाईल अशी चर्चा आहे.

२०२३मध्ये झालेली आशिया कप स्पर्धा हायब्रिड मॉडेलनुसार खेळाण्यात आली होती, ज्यात भारत आणि पाकिस्तान एकाच गटात होते. त्या स्पर्धेत उभय संघांमध्ये दोन सामने झाले. पहिला गट सामना भारताने जिंकला, तर सुपर



फोरमधील सामना पावसामुळे रद्द झाला, ज्यामुळे पाकिस्तान अंतिम फेरीत पोहचू शकला नाही. भारताने अंतिम फेरीत श्रीलंकेचा पराभव करून चषक उंचावला.

यंदाच्या आशिया कप स्पर्धेचे ठिकाण अद्याप घोषित झालेले नाही, पण रिपोर्टनुसार ड्रॉ मे महिन्यात होण्याची शक्यता आहे. सध्याची परिस्थिती पाहता तो पुढे ढकलला जाऊ शकतो. अंतिम निर्णय भारत-पाकिस्तानमधील तणावाची तीव्रता वाढते की कमी होते, यावर अवलंबून असेल.

महिला वनडे विश्वचषक स्पर्धा सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये भारतात होणार आहे. पाकिस्तानने या स्पर्धेसाठी पात्रता मिळवली आहे. या स्पर्धेत गट नसतील, कारण सर्व संघांच्या एकमेकांविरुद्ध राउंड-रॉबिन स्वरूपात लढती होणार आहेत. त्यामुळे भारत-पाकिस्तान यांचा सामना रंगणार आहे. आयसीसीने २०२४-२७साठी भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामने तटस्थ ठिकाणी खेळवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे हा सामना भारताबाहेर खेळला जाऊ शकतो.

भारत आणि श्रीलंका यांच्या संयुक्त यजमानपदाखाली २०२६मध्ये होणाऱ्या पुरुष टी-२० विश्वचषक स्पर्धेतही भारत-पाकिस्तान सामना श्रीलंकेत खेळवला जाईल.

भारत आणि पाकिस्तान यांच्यातील राजकीय तणावामुळे २०१२-१३नंतर द्विपक्षीय क्रिकेट सामने झालेले नाहीत. आयसीसी आणि एसीसी स्पर्धांमध्येच हे दोन संघ एकमेकांविरुद्ध खेळतात. आयसीसीने २०२४-२७साठी तटस्थ ठिकाणांचा नियम लागू केल्याने भारत-पाकिस्तान सामने युएई, श्रीलंका किंवा अन्य तटस्थ ठिकाणी होण्याची शक्यता आहे. तथापि, भारतात होणाऱ्या स्पर्धांसाठी भारत सरकारच्या परवानगीवर बीसीसीआयचा निर्णय अवलंबून असेल.

### बीसीसीआयची भूमिका

पहलगाम हल्ल्यांनंतर भारत आणि पाकिस्तान यांना भविष्यातील आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये एकाच गटात ठेवू नये, अशी विनंती भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेला केली असल्याची जोरदार चर्चा सुरू आहे. या संदर्भात बीसीसीआयचे उपाध्यक्ष राजीव शुक्ला यांनी स्पष्ट केले की, बोर्ड सरकारच्या सूचनेनुसारच निर्णय घेईल. एका वरिष्ठ बीसीसीआय अधिकाऱ्यानेही असे वृत्त फेटाळले आहे. बीसीसीआय राष्ट्रीय भावनांप्रती संवेदनशील आहे, परंतु सध्या अशी कोणतीही मागणी केलेली नाही, असे त्यांनी सांगितले आहे.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मताले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com